# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०१७ / फाल्गुन १९, १९३८ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(३) कृषी आणि फलोत्पादन मंत्री** | |
| **(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८३**

---

### डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील रस्त्यांची व नदीवरील पूलाची झालेली दुरवस्था

**(१) * २८२४५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्याच्या दुर्गम भागातील मुख्य रस्ते, दाभाडी ते किन्हवली रस्त्यांची तसेच, चळणी नदीवरील पूलाची दुरवस्था झाली असल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर रस्त्याची व नदीवरील पुलांची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) डहाणू तालुक्यातील किन्हवली दाभाडी गडचिंचले ते राज्य सरहद्द हा मुख्य रस्ता प्रजिमा क्र. १० आहे. या रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे डांबर मिश्रित खडीने भरण्यात आले आहेत. रस्त्याच्या क्षतिग्रस्त भागातील ८.२० कि.मी. लांबीसाठी रुंदीकरण मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. तालुक्यातील सायवन चळणी हा रस्ता इजिमा ३४ आहे. या रस्त्यावर कि.मी. ०/९०० मधील साकव सुस्थितीत आहे. कि.मी. २/१०० मधील आर.सी.सी. पाईपच्या साकवाची एक संरक्षक भिंत क्षतिग्रस्त झाली आहे. हा रस्ता जिल्हा परिषद, पालघर यांच्या अखत्यारीत आहे. रस्त्याच्या काही भागात दुरुस्तीची कामे व साकवच्या संरक्षक भिंतीच्या दुरुस्तीचे काम मंजूरी, निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

या दोन्ही रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

----------------

**राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतीमालाला हमीभाव देऊन खरेदी केंद्रे सुरु करण्याबाबत**

**(२) * २८२१८ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.आनंद ठाकूर, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील व्यापाऱ्यांची दुटप्पी खरेदीची भूमिका, अनुदानाच्या बाबतीत शासनाच्या अटी व शर्ती यामुळे शेतीमालाचे भाव २५ ते ४० टक्क्यांनी घटून भाज्या व फळे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचे एकरी रुपये २० ते ५० हजारांचे नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नोटाबंदीच्या काळात राज्यात शेतीमालाचे दर कोसळून शेतकऱ्यांचे रुपये ४ हजार कोटींचे नुकसान झाल्याचे फलोत्पादन मंडळाच्या माहितीवरुन माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून याच कालावधीत शेतीमालाला भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी टोमॅटो व वाटाण्याचे पीक फेकून दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने पिकाला हमीभाव दिला असला तरी हमीभावाने खरेदी करण्यासाठी केंद्रे सुरु करण्यात आली नसल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शेतकऱ्यांना नुकसानीचा मोबदला देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) फळे व भाजीपाला यासारख्या नाशवंत पिकासाठी किमान हमीभाव जाहिर केला जात नाही.

खरीप हंगाम २०१६-१७ मध्ये धान्य कडधान्य व तेलबियांचे पीक चांगल्या प्रमाणात झाल्यामुळे बाजारातील आवक वाढून शेतमालाचे दर कमी झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर राज्य शासनाने किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत मुग, सोयाबीन व तूरीची खरेदी केलेले आहे व खुल्या बाजारभावाने उडीदाची खरेदी केली आहे.

तसेच कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रु. १००/- अनुदान २०० क्विंटल प्रति शेतकरी मर्यादेत आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना रु. २००/- प्रति क्विंटल अनुदान २५ क्विंटल प्रति शेतकरीच्या मर्यादेत देण्याचा निर्णय घेतला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अनुसूचित जाती तसेच नवबौध्द शेतकऱ्यांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना राबविण्याबाबत**

**(३) * २६८६१ श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.रामराव वडकुते, श्री.नारायण राणे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती तसेच नवबौध्द शेतकऱ्यांच्या विकासासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेसाठी अनुदानाचे सूत्र व कार्यप्रणाली ठरविण्यासाठी मंत्रीमंडळाची उपसमिती स्थापन करण्यात येणार असून उपसमितीच्या निर्णयाप्रमाणे अनुदानाची रक्कम निश्चित करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपसमितीचे गठन करण्यात आले आहे काय, उपसमिती गठित झाली असल्यास समितीच्या शिफारशी काय आहेत,

(४) असल्यास, सदर योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.

(२) या योजनेंतर्गत सुक्ष्म सिंचन घटक वगळता उर्वरित सर्व घटकांची अनुदान मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

सुक्ष्म सिंचन दराच्या अनुदानाचे सुत्र व कार्यप्रणाली ठरविणेकरीता मा.मंत्री (कृषी) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येणार आहे. सदर समितीच्या शिफारशीनुसार अनुदानाची रक्कम व अनुदान देण्याच्या कार्यपद्धतीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) उपसमिती गठीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) सदर योजनेच्या अमंलबजावणीचा शासन निर्णय दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सदर योजनेंतर्गत नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास विहीरी सोबतच पंपसंच, वीज जोडणी आकार या घटकांचा लाभ सन २०१६-१७ या वर्षापासून देण्यात येणार आहे. सुक्ष्म सिंचन घटकाचा लाभ समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर समितीच्या शिफारशीनुसार देण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येवला व निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांची श्रेणी-१ मध्ये दर्जा वाढ करण्याबाबत

**(४) * २६९१८ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला व निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील श्रेणी-२ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांची श्रेणी-१ मध्ये दर्जा वाढ करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोंबर, २०१५ व सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पशुवैद्यकीय दवाखान्यांची श्रेणी-१ मध्ये दर्जा वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे आहे.

(२) नाशिक जिल्हयातील ७१ श्रेणी-२ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांचा पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ मध्ये दर्जावाढ करणेस्तव आवश्यक पदनिर्मितीचा प्रस्ताव सन २०१३ मध्ये वित्त विभागास सादर करण्यात आला असता, वित्त विभागाने राज्याची वाढती महसूली तूट, राज्याच्या तिजोरीवरील ताण तसेच, आस्थापना खर्च मर्यादित ठेवण्याची निकड लक्षात घेता आर्थिक भाराच्या वाढीचे प्रस्ताव सादर करण्यात येवू नयेत, असे अभिप्राय दिलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील टॅक्सीचालकांच्या असभ्य वर्तणुकीबाबत

**(५) * २९२४५ श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील टॅक्सीचालकांकडून जवळचे प्रवासी भाडे नाकारणे, प्रवाशांसोबत असभ्य वर्तणुक करणे, मीटरपेक्षा अधिकचे भाडे आकारणे, महिलांना टॅक्सीच्या पुढील सीटवर बसण्यास प्राधान्य न देणे इत्यादी टॅक्सीचालकांच्या बेशिस्त वर्तणुकीला प्रवाशांना सामोरे जावे लागत असून त्याबाबतच्या तक्रारी प्रवाशांनी प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा बेशिस्त टॅक्सीचालकांवर प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई यांच्याकडून होणारी कारवाई अपुरी असल्याने टॅक्सीचालकांवर त्याचा काहीही परिणाम होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या टॅक्सीचालकावर कारवाई करून त्यांच्याकडून शिस्तबध्द पध्दतीने प्रवासी भाडे वाहतुक करण्याची सूचना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) अशा स्वरुपाच्या तक्रारी परिवहन कार्यालयास दूरध्वनीव्दारे, ई-मेलव्दारे व लेखी स्वरुपात प्राप्त होतात. त्यानुसार बेशिस्त टॅक्सीचालकांवर परिवहन विभागाकडून दंड वसूली, परवाना व अनुज्ञप्ती निलंबनाची कारवाई करण्यात येते. मुंबईतील तीन प्रादेशिक परिवहन कार्यालयानी एप्रिल, २०१६ ते जानेवारी, २०१७ या कालावधीत ३८९३ प्राप्त तक्रारीपैकी २७६८ तक्रारी निकाली काढल्या आहेत. कसूरदारांकडून रु.१३,३९,७००/- दंड वसुल केला असून एकूण २७६८ परवाने व अनुज्ञप्ती निलंबित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय कृषी पीक विमा योजनेंतर्गत जाहीर केलेली नुकसान भरपाई मिळणेबाबत

**(६) * २६८०८ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २५६३५ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय कृषी पीक विमा योजना खरीप-२०१५ अंतर्गत ८२.५० लाख शेतकऱ्यांनी सहभाग घेवून ४९.३३ लाख हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केले होते, त्यापैकी ७१.५० लाख शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरलेत व त्यांना रुपये ४२०५.०५ कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत मंजुर करण्यांत आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नुकसान भरपाई रक्कम पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठी संबंधित बँकांना भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत वितरीत करण्यांत आली असून माहे नोव्हेंबर, २०१६ अखेरपर्यंत केवळ ६९.६५ लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर संबंधित बँकामार्फत रुपये ४०२७.१७ कोटी नुकसान भरपाई रक्कम वर्ग करण्यांत आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित रकमेसंबंधी उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधित बँकाकडून प्राप्त करुन घेणेबाबत भारतीय कृषी विमा कंपनीकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खरीप-२०१५ हंगामासाठी मंजुर नुकसान भरपाई रक्कम संपुर्णपणे पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय

(२) भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत प्राप्त अहवालानुसार एकूण नुकसान भरपाई रक्कम रूपये ४२०५.०५ कोटी पैकी, रुपये ४०६३.५५ कोटी रक्कम संबंधित बँकामार्फत पात्र शेतकऱ्यांना अदा करण्यात आली आहे. उर्वरीत १४१.५० कोटी रक्कमेपैकी ५९.२३ कोटी रक्कम काही बँकांमार्फत विविध कारणास्तव (जसे एकाच पिकाचा/क्षेत्राचा विमा अनेक बँकांमध्ये सादर करणे, चुकीची कागदपत्रे सादर करणे इ.) भारतीय कृषी विमा कंपनीस परत करण्यात आली आहे व रूपये ८२.२७ कोटी रकमेचे डिस्चार्ज व्हाऊचर व उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित बँकामार्फत अद्याप भारतीय कृषी विमा कंपनीस प्राप्त झालेले नाहीत.

(३) भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई रक्कम संबंधित नोडल बँकांना वर्ग केल्यानंतर ज्या बँकांनी अद्याप नुकसान भरपाई रक्कम पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करून त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले नाही अशा बँकांना भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत वेळोवेळी ई-मेल द्वारे व स्मरणपत्राद्वारे सुचित करण्यात आले आहे.

(४) राष्ट्रीय कृषी विमा योजना खरीप २०१५ हंगामासाठी मंजुर नुकसान भरपाई रक्कम संपूर्णपणे पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करणेबाबत भारतीय कृषी विमा कंपनीस वेळोवेळी सुचित करण्यात आले आहे. त्यानुसार भारतीय कृषी विमा कंपनीची कार्यवाही सुरु आहे.

त्याचप्रमाणे ज्या बँकांचे उपयोगिता प्रमाणपत्र अद्यापपर्यन्त प्रलंबित आहेत त्यांनी ते भारतीय कृषी विमा कंपनीस सादर करणेबाबत संबंधित बँकांकडे पाठपुरावा करणेत यावा अशा सुचना क्षेत्रियस्तरावर देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नायगाव (ता.हवेली, जि.पुणे) येथील ओढ्यात वाळू धुण्यास प्रतिबंध घालण्याबाबत

**(७) * २७०५१ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील प्रयागधाम रस्त्यालगत असलेल्या ओढ्याजवळ मोठया प्रमाणात ट्रकने आणलेली वाळू धुतली जात असल्याने नायगाव येथील पाण्याचे स्त्रोत दूषित झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार ओढयाचे स्त्रोत दूषित होऊ नये म्हणून नायगाव येथील ओढ्याच्या जवळ वाळू धुण्यास प्रतिबंध करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) मौजे नायगाव, ता.हवेली येथे वाळू धुण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर ठिकाणी वाळु धुत असलेल्या इसमांना नोटीस देण्यात आली आहे. तसेच अवैध उत्खनन केलेली वाळू धुत असताना आढळलेल्या इसमांकडून यापूर्वीच रूपये ५०,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला असून, संबंधित इसमांकडून पुन्हा वाळू धुणार नसल्याबाबत लेखी प्रतिज्ञापत्र घेण्यात आले आहे.

याशिवाय मौजे नायगांव येथील प्रयागधाम रस्त्यालगत असलेल्या ओढ्यामधील पाण्याचे स्त्रोत दुषित झाले आहे किंवा कसे याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, पुणे यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे तहसिलदार कार्यालयातील (जि.ठाणे) रेकॉर्ड रूमची दुरूस्ती करण्याबाबत

**(८) * २९२९६ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे तहसिलदार कार्यालयातील (जि.ठाणे) रेकॉर्ड रूममधील दस्तऐवज हे विखुरलेल्या अवस्थेत असून याठिकाणी वीज नाही, कर्मचारी नाही, धुळ व घाण पसरलेले असल्याने रेकॉर्ड रूमची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यालयातील अस्वच्छता व कामकाजातील दिरंगाई तसेच नागरिकांना/ज्येष्ठ नागरिकांना दस्तऐवजाची नक्कल मिळविण्यासाठी वारंवार कार्यालयात यावे लागत असल्याने त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार तहसिलदार कार्यालयाची दुरुस्ती करण्याबाबत तसेच, नागरीकांची होणारी गैरसोय दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) असे निदर्शनास आले नाही. ठाणे तहसील कार्यालयातील अभिलेख कक्ष अद्यावत करण्यात आला असून सर्व दस्तऐवज अ, ब, क आणि ड या श्रेणीत वर्गीकृत केले आहेत. सदरहू अभिलेख ६ गठ्ठे पध्दतीने ठेवण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद जिल्हयात शेतकऱ्यांच्या दुष्काळी अनुदान वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(९) * २९०३२ श्री.सुभाष झांबड, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात सन २०१५-१६ या वर्षात जिल्हयाला दुष्काळी अनुदानाचे रुपये २०९ कोटींचा निधी मिळाला असून त्यात शेतकरी अनुदान वाटपाच्या पाच हजार प्रकरणात गैरव्यवहार झाल्याचे प्राथमिक चौकशीत माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली ही रक्कम सुमारे रूपये १ कोटींची आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अनुदान वाटपामध्ये गैरव्यवहार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) औरंगाबाद जिल्हयाकरिता प्राप्त झालेला दुष्काळ निधी बाधीत शेतकऱ्यांना वाटप करण्यात आला. निधी वाटप करतांना काही ठिकाणी अनियमितता झाली असल्याने लेखापरिक्षण तपासणीमध्ये दुबार रकमा प्रदान झाल्याचे निदर्शनास आले, ज्यात रक्कम रुपये १,४२,५९,२१३/- ची अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे. त्यापैकी रुपये ६६,३३,४९५/- इतकी रक्कम वसुल करण्यात आले असून उर्वरित रक्कम वसुल करणेबाबतची कार्यवाही चालू आहे.

अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या तीन तलाठी व एक अव्वल कारकून यांना निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कृषी विभागाच्या बेजबाबदार कारभारामुळे शेतकरी शासकीय योजनेपासून वंचित राहिल्याबाबत

**(१०) * २८१५४ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील शेतकऱ्यांकरिता कृषी विभागामार्फत विविध योजना राबवून त्यासाठी कोट्यवधी रूपयांचा निधी दरवर्षी खर्च करण्यात येत असून सन २०१६ मध्ये शेतकऱ्यांसाठी मुरबाड तालुक्यात कृषी विभागाने हजारो कलमी आंब्यांची झाडे आणली होती, सदरहू झाडे शेतकऱ्यांना माहे ऑक्टोंबर-नोव्हेंबर या महिन्यात म्हणजेच पावसाळा संपल्यानंतर शेतकऱ्यांना वाटप करण्याचा उपक्रम सुरू केल्यामुळे शेतकऱ्यांनी सदरहू झाडांची उचल केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांनी झाडांची उचल न केल्यामुळे हजारो आंब्याची कलमे ही लागवडी अभावी सुकून गेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी विभागाच्या बेजबाबदार कारभारामुळे शेतकरी शासकीय योजनेपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कृषी विभागाच्या बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

उपविभागीय कृषी अधिकारी, कल्याण यांच्यामार्फत या संदर्भात चौकशी करण्यात आली असता, चौकशीत तथ्य आढळून आलेले नाही.

----------------

**राज्यातील दूध दरवाढ रोखण्याबाबत**

**(११) * २८२३९ श्री.आनंदराव पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी आणि सहकारी दूध संघानी दरवाढीचा निर्णय घेतल्यानंतर महानंद डेअरीने प्रतिलिटर दुधाच्या विक्री दरात दोन रुपयांची वाढ केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दुध उत्पादक शेतकऱ्याला एकसमान खरेदी दर मिळावा अशी दुध उत्पादक शेतकरी व उत्पादक संस्था यांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून बेकायदा दूध दर वाढ करणाऱ्यांवर कारवाई करून दुध दरवाढ रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) दूध उत्पादन खर्च व बाजारपेठीतील स्पर्धात्मक दर इत्यादींचा विचार करुन महासंघाने दिनांक ७/२/२०१७ पासून दूध विक्रीत प्रति लिटर रुपये २.०० ने वाढ केली आहे.

(२), (३) व (४) अशाप्रकारची निवेदने वेळोवेळी शासनाकडे प्राप्त होत असतात. राज्यात दुधाकरीता पुष्टकाळ व कृशकाळ असतात. राज्यात खाजगी, सहकार व शासन या तीन क्षेत्राद्वारे दूध हाताळणी केली जाते. शासन केवळ शासकीय दुधाकरीता खरेदी व विक्री दर निश्चित करीत असते.

शासनाचा दूध खरेदी दर सहकारी दूध संघानीही दूध उत्पादकांना द्यावा यासाठी दिनांक १०/७/२०१५ रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६१ च्या कलम ७९ अ अन्वये निदेश निर्गमित केले आहेत. खाजगी दूध खरेदी/विक्री दरावर शासनाचे नियंत्रण नाही. मात्र जीवनाश्यक वस्तू अधिनियम १९५५ मधील तरतूदीनुसार दुधाकरीता किमान आधारभूत किंमत निश्चित करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनास विनंती केली आहे. सदर बाब ही केंद्र शासनाच्या अखत्यारीतील बाब आहे.

-----------------

## सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील पशुवैद्यकीय चिकित्सालयात योग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(१२) * २८९६५ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील पशुवैद्यकीय चिकित्सालयात योग्य सुविधा उपलब्ध होत नसल्यामुळे जनावरे मोठ्या प्रमाणात दगावत असल्याची घटना दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर पशुचिकित्सालयात योग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गाची झालेली दुरवस्था

**(१३) * २७१९३ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-सोलापूर दरम्यानच्या राष्ट्रीय महामार्गावरील कामे अतिशय निकृष्ट दर्जाची असल्यामुळे रस्त्याची दुरवस्था झाली असून या मार्गावरील अनेक कामे अपूर्ण असूनही टोल आकारला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार महामार्गाची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

पुणे सोलापूर ह्या राष्ट्रीय महामार्ग ६५ (जुना ९) चे रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने खाजगीकरणामधून तीन भागामध्ये चौपदरीकरण पूर्ण करण्यात आलेले आहे. त्यापैकी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत असलेल्या कि.मी. ४०/०० ते १५०/०५० या दुसऱ्या भागातील भिगवण गावाजवळील उड्डाणपुलाच्या मे, २०१६ मध्ये क्षतीग्रस्त झालेल्या स्लॅबची जून, २०१६ मध्ये पुनर्बांधणी करण्यात आलेली असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई उपनगर जिल्ह्यातील तलाठी कार्यालयाची दुरूस्ती करण्याबाबत

**(१४) * २७५०८ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, अॅड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, अॅड.जयदेव गायकवाड, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर जिल्ह्यांतील तलाठी कार्यालयांच्या जुन्या इमारती धोकादायक व दुरवस्थेत असल्यामुळे महसुल विभागातील महत्वाची कागदपत्रे सुरक्षित नसल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार तलाठी कार्यालयाच्या इमारतीची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मुंबई उपनगर जिल्ह्यातील काही तलाठी कार्यालयांच्या इमारतींची दुरुस्ती करणे आवश्यक आहे, ही वस्तुस्थिती आहे. मात्र त्यामुळे महसूल विभागाची कागदपत्रे असुरक्षित आहेत अशी परिस्थिती नाही.

(२) व (३) दुरुस्ती आवश्यक असणाऱ्या तलाठी कार्यालयांच्या दुरुस्तीबाबतची अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तयार करुन घेऊन शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना कळविण्यात आले आहे.

-----------------

## ठाणे प्रादेशित परिवहन कार्यालयात रस्ता सुरक्षा अभियान निधीचा अपहार झाल्याबाबत

**(१५) * २७३९७ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे प्रादेशित परिवहन कार्यालयात रस्ता सुरक्षा अभियानाकरिता उपलब्ध झालेल्या अडीच लाख रक्कमेचा वापर न करता अपहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार रस्ता सुरक्षा अभियानाच्या कामासाठी उपलब्ध निधीचा अपहार करणाऱ्या संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यात बेकायदेशीर होणारे ब्रास डबर खडीचे उत्खनन रोखण्याबाबत

**(१६) * २८२८४ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील भिमाशंकर, कळसूबाई, हरिश्चंद्रगड या ३ अभयारण्य हद्दीत व मुरबाडी, काळू नदी, डोईफोडी, कलकवीरा या नद्यांच्या गावालगत पात्रामध्ये मोठया प्रमाणावर ब्लास्टिक करून बेकायदेशीररित्या सर्रासपणे रोज हजारो ब्रास डबर खडीचे उत्खनन व वाहतूक एक वर्षापासून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू खदान व्यावसायिकांनी कोणतीही परवानगी घेतलेली नसल्याने शासनाला दररोज मिळणाऱ्या लाखो रूपयांच्या रॉयल्टीपासून वंचित व्हावे लागत आहे तसेच वन्य प्राणी व वाड्यावस्त्यांना हादरे बसत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बेकायदेशीररित्या ब्रास डबर खडीचे उत्खनन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) मुरबाड तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीला आळा घालण्यासाठी भरारी पथके स्थापन करण्यात आली असून, सदर पथकांमार्फत वेळोवेळी तपासणी करण्यात येते.

तसेच, अभयारण्य क्षेत्रिय वन कर्मचारी व अधिंकारी यांच्यामार्फत नियमितपणे गस्त घालण्यात येऊन बेकायदेशीर बाबींवर निगराणी ठेवण्यात येत आहे.

-----------------

## विदर्भातील अप्पर वर्धा धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१७) * २६७४८ श्री.नारायण राणे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील तीन जिल्हयातील हजारो एकर जमिनीवर व्यापलेल्या अप्पर वर्धा धरणात शेती व घरे गेल्याने सुमारे चार हजाराहून अधिक शेतकरी बेघर झाले असून सदर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी पुनर्वसनाच्या मागण्याबाबत मुंबईतील आझाद मैदानात बेमुदत ठिय्या आंदोलन केले असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय

(२) अप्पर वर्धा प्रकल्पांतर्गत अमरावती व वर्धा जिल्ह्यातील एकूण २४ प्रकल्पबाधीत गावांचे २७ ठिकाणी पुनर्वसन केले असून, पुनर्वसित गावठाणात नागरी सुविधा निर्माण करुन त्यांचे हस्तांतरण जिल्हापरिषदेकडे करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात पर्ससीन नेटद्वारे मासेमारी करण्यास परवानगी देण्याबाबत**

**(१८) * २६८०५ श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुनिल तटकरे, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक २०४३५ ला दिनांक २६ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**

सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केरळ व कर्नाटक राज्यात पर्ससीन नेटद्वारे मासेमारी केली जात असून राज्यात पर्ससीन नेटद्वारे मासेमारी करण्यास शासनाने बंधन घातले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्यातील मच्छिमारांना पर्ससीन नेटद्वारे मासेमारी करण्यास परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) माहे सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीत राज्याच्या जलधी क्षेत्रातील काही निर्बधीत क्षेत्राबाहेर व काही समुद्र खोली बाहेर पर्ससीन नेटद्वारे मासेमारी करण्यास मुभा देण्यात आली आहे. तसेच राज्याच्या जलधी क्षेत्राबाहेर पर्ससीन पध्दतीने मासेमारी करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनाचे पालन करुन अटी व शर्ती नुसार मासेमारी करण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यात बळीराजा चेतना अभियानाच्या निधीचा अपहार झाल्याबाबत**

**(१९) * २८०२१ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यात बळीराजा चेतना अभियानाच्या निधीचा कृषी विभागाकडून गैरवापर झाल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राळेगांव तालुक्यात पाच ठिकाणी कृषी विभागाकडून शेतकरी मार्गदर्शन शिबीर घेण्याकरिता रुपये एक लाख पंचवीस हजार निधी प्राप्त झाला होता, परंतु मार्गदर्शन शिबीर न घेताच परस्पर निधीचा अपहार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार निधीचा अपहार करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मानवत (जि.परभणी) येथील शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे हटविण्याबाबत**

**(२०) * २७८३५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवत (जि.परभणी) येथील गावठाण या सुमारे रूपये २०० कोटींचे मुल्य असणाऱ्या शासकीय जमिनीवर झालेले अतिक्रमण हटवून जागा शासनाला परत मिळावी यासाठी जिल्हाधिकारी, परभणी यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद, मानवत व उप अधिक्षक, भुमि अभिलेख, मानवत यांना सन २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आदेशीत केलेले असता, संबंधित अधिकारी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याऐवजी गैरप्रकार करत असल्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गैरप्रकार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने मानवत नगरपरिषदेने सन २०१२ मध्ये सदर जागेच्या हस्तांतरणाबाबतची नोंद मालमत्ता पत्रकावर घेतली.

यासंदर्भात श्री.शेख जावेद अब्दुल सत्तार यांनी दिनांक १६/०९/२०१३ रोजी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३०८ नुसार जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे अपिल दाखल केले आहे.

सदर प्रकरणी दिनांक १२/०३/२०१५ व दिनांक २९/०६/२०१५ रोजीच्या पत्रान्वये मुख्याधिकारी, नगरपरिषद मानवत यांना मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सूचित केले आहे.

यासंदर्भात नगरपरिषदेच्या विधी सल्लागाराचे अभिप्रायानुसार उच्च न्यायालयात याचिका दाखल करता येत नसल्याने सदर प्रकरणी करावयाच्या पुढील कार्यवाहीबाबत मानवत नगरपरिषदेने जिल्हाधिकाऱ्यांकडे मार्गदर्शनार्थ सादर केले आहे.

जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे दाखल केलेले उक्त नमूद अपिल प्रलंबित आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी सुस्पष्ट अहवाल एक महिन्यात सादर करण्यास जिल्हाधिकारी, परभणी यांना सूचित केले आहे.

-----------------

## आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील पशुवैद्यकीय श्रेणी-१ चे रुपांतर तालुका पशुचिकित्सालयामध्ये करण्याबाबत

**(२१) * २८४६२ श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ चे रुपांतर तालुका पशुचिकित्सालयामध्ये करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पशुसंवर्धन मंत्री यांचेकडे दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ चे रुपांतर तालुका पशुचिकित्सालयामध्ये करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे आहे.
(२) पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी-१ आर्णी या दवाखान्याचे तालुका लघुपशुवैद्यकिय सर्वचिकित्सालयामध्ये रुपांतर करणे ही धोरणात्मक बाब आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**लेंडी (जि.पालघर) धरणग्रस्तांवर होत असलेल्या अन्यायाबाबत**

**(२२) * २७०७९ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लेंडी धरणाच्या (ता.जव्हार, जि.पालघर) बुडीत क्षेत्रामध्ये पाच महसूल गावातील १८० हेक्टर क्षेत्र शासनाने अधिकृतरित्या संपादीत केले नसताना ठेकेदाराने धाक दडपशाहीने या धरणाचे काम पूर्ण केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लेंडी धरणग्रस्तांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १६ जून, २०१६ रोजी, जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे दिनांक २६ मे, २०१६ रोजी आणि उपविभागीय अधिकारी, जव्हार यांच्याकडे दिनांक ६ फेब्रुवारी, २०१६ रोजी होत असलेल्या अन्यायाबाबत बेमुदत ठिय्या आंदोलन करण्याचे लेखी निवेदन व तक्रार अर्ज केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार प्रकल्पग्रस्तांची फसवणूक करून धाक दडपशाहीने त्यांच्या जमिनी कब्जात घेऊन त्यावर अनधिकृतपणे काम करणाऱ्या ठेकेदारावर व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच प्रकल्पग्रस्ताच्या पुनर्वसनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

लेंडी धरणाचे काम सन २००१ पासून प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे बंद ठेवण्यात आलेले आहे.

लेंडी धरणाच्या बुडीत क्षेत्रातील लोकांची लेखी संमतीपत्रे प्राप्त करून जानेवारी, २००८ दरम्यान प्रत्यक्ष कामास सुरूवात केली आहे. अद्याप धरणाची घळभरणी झालेली नाही.

(२) होय. हे अंशत: खरे आहे.

लेंडी धरणग्रस्त संघर्ष समिती यांचे दिनांक १४/६/२०१६ रोजीचे मा.मुख्यमंत्री यांना दिलेले निवेदन या कार्यालयास दिनांक २३/८/२०१६ रोजी प्राप्त झाले आहे.

(३) प्रकल्पग्रस्त समितीचे दिनांक ९/१/२०१७ चे निवेदन सुध्दा या कार्यालयास प्राप्त झाले आहे. त्यानुसार कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांनी प्रकल्पग्रस्त समितीच्या पदाधिकारी व क्षेत्रिय अधिकारी यांचे समवेत दिनांक १९/१/२०१७ रोजी बैठक आयोजित केली होती. या बैठकीत प्रकल्पग्रस्तांच्या तक्रारींचे निवारण करून त्यांना आंदोलनापासून परावृत्त करण्यासाठी आवाहन केले.

लेंडी धरणाच्या बुडीत क्षेत्रातील ५ महसूली गावातील १७२ हेक्टर क्षेत्राची भूसंपादन प्रक्रिया नवीन भूसंपादन कायदा २०१३ व दिनांक १२ मे, २०१५ च्या शासन निर्णयान्वये महसूल विभागामार्फत प्रगतीपथावर आहे.

लेंडी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील भोताडपाडा या गावाचे पुनर्वसन मौजे भरसरमेट येथे प्रस्तावित केलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तुळजापूर-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील सांगवी (काटी) या गावासाठी भुयारी मार्ग करण्याबाबत

**(२३) * २८०५८ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर-सोलापूर राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरणाचे काम सुरु असून या महामार्गालगत जिल्हा परिषदेची शाळा असल्याने विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यांच्याकरीता महामार्ग ओलांडण्याकरीता सांगवी (काटी) या गावापासून भुयारी मार्ग ठेवण्यात यावा, अशी मागणी स्थानिक ग्रामपंचायतीने शासनाकडे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार महामार्ग ओलांडण्याकरीता सांगवी (काटी) या गावातून भुयारी मार्ग ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशा आशयाचे निवेदन जुलै, २०१६ मध्ये प्राप्त झाले असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांनी कळविले आहे.

(२) या प्रकल्पाच्या स्वतंत्र अभियंता यांना महामार्ग ओलांडण्याकरिता सांगवी (काटी) या गावातून भूयारी मार्गाचा प्रस्ताव तपासून नागरीकांना महामार्ग सुरक्षितपणे ओलांडण्यासाठी कार्यपध्दती सुचविण्याबाबत सूचना देण्यात आल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-पुणे व नाशिक महामार्ग टोलमुक्त करण्याबाबत

**(२४) * २६७६२ श्री.संजय दत्त, श्री.अमरिशभाई पटेल, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, डॉ.अपूर्व हिरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५३ टोलनाके बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असतांना मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर बेकायदेशीर टोल वसूली सुरू असल्याचे तसेच, नाशिक जिल्ह्यातील पिंपळगांव (बसवंत) ते गोंदे महामार्गावरील रस्ता मार्ग रुंदीकरणाची कामे अपूर्ण असूनही टोल वसूली केली जात असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-पुणे महामार्ग राज्य शासनाच्या अखत्यारीत येत असून रुपये ९१८ कोटी अपफ्रंट स्वीकारुन रस्ते विकास महामंडळाने त्यावर १५ वर्षे (ऑगस्ट, २०१९ पर्यंत) टोल स्वीकारण्याचा कंत्राट आयडियल रोड बिल्डर्सला (आयआरबी) दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या टोलद्वारे ठेकेदारास रूपये २८६९ कोटी मिळणार आहे प्रत्यक्षात या ठेकेदारास ८ नोव्हेंबरपर्यंत रुपये २८७६ कोटी मिळाले असून महिन्याला सुमारे रुपये ४० कोटी टोलच्या माध्यमातून ठेकेदारास मिळणार असल्याने सामाजिक कार्यकर्त्यांनी मुंबई-पुणे महामार्ग टोलमुक्त करण्याबाबत मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिनांक ३१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रार दिली आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई शहराच्या प्रवेशद्वारावरील पाच टोल व पुणे मुंबई एक्सप्रेस हायवेवरील पाच टोलनाक्यासह राज्यातील संपूर्ण टोल वसुली बंद करण्यासंदर्भात नेमलेल्या समितीने अहवाल सादर करून टोल नाक्यांवरील टोल वसुली बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर सुरु असलेली पथकर वसुली बेकायदेशीर नसून करारनाम्यातील तरतुदीनुसार आहे.

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत पिंपळगांव (बसवंत) ते गोंदे ह्या राष्ट्रीय महामार्गाचे सहापदरीकरणाच्या करारनाम्यातील तरतुदीनुसार आवश्यक कामे पूर्ण झाल्यानंतर पथकर वसूली करण्यात येत आहे.

(२) होय.

(३) तक्रार प्राप्त झाली हे खरे आहे.

(४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून दिनांक २२/०२/२०१७ रोजी तक्रारदारांना खुलासा देण्यात आला आहे.

मुंबई शहराच्या प्रवेशद्वारावरील पाच पथकर नाके व मुंबई पुणे मार्गावरील पथकर संदर्भात नेमलेल्या अप्पर मुख्य सचिव (सा.बां.) यांचे अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल शासनास दिनांक २७/०४/२०१६ रोजी सादर झाला असून सदर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील वांद्रे शासकीय वसाहतीचा पुनर्विकास करण्याबाबत**

**(२५) * २७९२७ ॲड.अनिल परब, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक २४८१८ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे शासकीय वसाहतीचा पुनर्विकास करण्याबाबतची कार्यवाही प्रलंबित असून गत ४० वर्षापासून कर्मचाऱ्यांकडून मा.मुख्यमंत्री महोदयांकडे होत असलेल्या मागणीबाबत काहीही कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासकीय वसाहतीचा प्रश्न निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) वांद्रे शासकीय वसाहतीचा पुनर्विकास करण्याबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शेतकरी आत्महत्या रोखण्याबाबत**

**(२६) * २६९४९ प्रा.अनिल सोले, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.शरद रणपिसे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामराव वडकुते, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.संजय दत्त, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश गजभिये, श्री.मितेश भांगडिया, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या ह्या शासनाच्या शेती समस्याच्या चुकीच्या धोरणामुळे होत असल्याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे याचिका दाखल करण्यात आल्याचे दिनांक २७ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात नापिकी व कर्जबाजारीपणामुळे सन २००४ मध्ये ५२४ शेतकरी, सन २०१४ मध्ये २५६८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे तसेच राष्ट्रीय गुन्हे माहिती संस्थेच्या (एनसीआरबी) अलिकडेच प्रसिध्द झालेल्या सन २०१५ च्या अहवालानुसार माहे जानेवारी, २०१५ ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत ३०३० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे तर सन २०१६-१७ मध्ये २११५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत तसेच, शेतकरी आत्महत्या रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे शेतकरी आत्महत्यांबाबत रिट पिटीशन क्र.६८७८/२०१६ दाखल करण्यात आली आहे.
(२) राज्यात सन २००४ मध्ये ६४० शेतकरी आत्महत्येची प्रकरणे झाली असून त्यापैकी ३४७ पात्र व २९३ प्रकरणे अपात्र झालेली आहेत.

सन २०१४ मध्ये २०३९ शेतकरी आत्महत्येची प्रकरणे झाली असून त्यापैकी १३५८ पात्र व ६७४ प्रकरणे अपात्र झालेली आहेत.

सन २०१५ मध्ये ३१९० शेतकरी आत्महत्येची प्रकरणे झाली असून त्यापैकी २११५ पात्र व १०४५ प्रकरणे अपात्र झालेली आहेत.

सन २०१६ मध्ये ३०५२ शेतकरी आत्महत्येची प्रकरणे झाली असून त्यापैकी १६२१ पात्र व ११६७ प्रकरणे अपात्र झालेली आहेत.

१ जानेवारी ते ३१ जानेवारी, २०१७ अखेरपर्यंत १८६ शेतकरी आत्महत्येची प्रकरणे झाली असून त्यापैकी २८ पात्र व ११ अपात्र झालेली आहेत व १४७ प्रकरणी चौकशी सुरू आहे.
(३) शेतकरी आत्महत्यांप्रकरणी अपात्र प्रकरणांना आर्थिक मदत अनुज्ञेय नाही. तसेच दि.२३/१/२००६ च्या शासन निर्णयानुसार पात्र प्रकरणी रु.१ लक्ष सानुग्रह अनुदान देण्यात येते. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये प्रायोगिक तत्वावर बळीराजा चेतना अभियान राबविण्यात येत असून कै.वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशन अंतर्गत अमरावती व मराठवाडा विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा जिल्हा अशा १४ जिल्ह्यांमध्ये उपाययोजना राबविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांच्या नविन वेतन करार निश्चित करण्याबाबत**

**(२७) * २९१२९ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतन कराराची मुदत ३१ मार्च रोजी संपली असून १ एप्रिल पासून नविन वेतन करार अंमलात येणे गरजेचे असताना एसटी प्रशासनाकडून पगारवाढी संदर्भात नेमलेल्या वेतन सुधार समितीला माहे फेब्रुवारी, २०१७ पर्यंत मुदतवाढ देऊन या संदर्भात शासन दुर्लक्ष करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी एसटी कर्मचारी संघटनांकडून काढण्यात आलेल्या मोर्चाची दखल घेत मा.परिवहन मंत्री यांनी चर्चा करुन तोडगा निघाला नसल्याने एसटी कर्मचारी संघटनांनी माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मंत्रालयावर मोर्चाचे आयोजन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एसटी कर्मचाऱ्यांना राज्य शासनाच्या कामगाराप्रमाणे वेतन निश्चित करुन एसटी कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अशी बाब नाही.

(२) महाराष्ट्र एस.टी. कर्मचारी कॉंग्रेस या संघटनेने दिनांक ०३/०१/२०१७ रोजी आझाद मैदान येथे मोर्चाचे आयोजन केले होते.

(३) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना वेतन आयोगाची तरतूद लागू नाही. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसाठी कामगार करारानुसार वेतन व भत्ते अदा करण्याची तरतूद आहे. महाराष्ट्र एस.टी. कामगार संघटना ही मान्यताप्राप्त संघटना असून या संघटनेबरोबर वाटाघाटी करुन दर चार वर्षांनी कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्याबाबत कामगार करार केला जातो. सन २०१२-२०१६ चा कामगार करार संपल्यानंतर पुढील कामगार करारासाठी मान्यताप्राप्त संघटनेसमवेत त्यांनी दिलेल्या मागण्यांबाबत वाटाघाटी चालु आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धानोरा (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) गावात दूधामुळे विषबाधा झाल्याबाबत**

**(२८) * २८४३७ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धानोरा (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) गावात पिसाळलेल्या दोन गायींचे दूध सलग पाच दिवस ज्या वाडी-वस्त्यांवर वितरीत करण्यात आले त्या सर्व ठिकाणच्या ८१ लोकांना विषबाधा झाल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार विषबाधा झालेल्यांना शासनाने कोणत्या स्वरूपाची आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) धानोरा (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) या गावात पिसाळलेला कुत्रा चावल्याने दोन गाई पिसाळल्या ही बाब खरी आहे, परंतू सदर गाईंचे दूध वितरीत करण्यात आल्याने ८१ लोकांना विषबाधा झाल्याची बाब खरी नाही.

(२) पिसाळलेल्या गाईंचे दूध सेवन केल्याने लोकांना कोणताही त्रास झाल्याचे निदर्शनास आलेले नाही परंतू तरीही खबरदारीचा उपाय म्हणून अँट रेबीजची लस सदरहू दूधाचा वापर केलेल्या ८१ नागरिकांना देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खेड (जि.पुणे) तालुक्यात औद्योगिक वसाहतीसाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या रस्त्यालगतची अनधिकृत बांधकामे हटविण्याबाबत**

**(२९) * २६८२२ श्री.अनिल भोसले, अॅड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील औद्योगिक वसाहतीसाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या रस्त्यालगत अनधिकृत बांधकाम करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशी अनधिकृत बांधकामे सुरु राहिल्यास भविष्यात वाहतुकीसाठी रस्ताच शिल्लक राहणार नसल्यामुळे स्थानिक नागरीकांनी शासनाकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार रस्त्यालगतची अनधिकृत बांधकामे हटविण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही. विभागांतर्गत ताब्यात असणाऱ्या रस्त्यांचे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या हद्दीतून जाणाऱ्या लांबीमध्ये सद्य:स्थितीत कोणतेही अतिक्रमण नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मनोर-वाडा-भिवंडी (जि.पालघर) रस्त्यांच्या अपुर्ण कामांबाबत**

**(३०) * २७५४२ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २४७७५ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मनोर-वाडा-भिवंडी (जि.पालघर) या रस्त्याचे काम माहे ऑक्टोबर, २०१० पासून सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीस देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम पुर्ण झालेले नसताना तसेच कंत्राटदाराने शासनाच्या रॉयल्टीची रक्कम (स्वामित्व धन), आदिवासी जमीन नजराण्याची रक्कम न भरता शासनाची फसवणूक केलेली असताना, शासनाच्या मेरी या संस्थेमार्फत, सदर रस्त्याचे काम पुर्ण झाल्याचे मा.उच्च न्यायालयास सांगितले असल्याचे दिनांक ३० डिसेंबर २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे ऑक्टोबर, २०१० पासून या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाल्यापासून, रस्ता चौपदीकरणाच्या मूळ आराखड्याप्रमाणे सेवा रस्ते, काँक्रिट गटार, उड्डाणपुल इत्यादीची उभारणी आवश्यक असतानाही अनेक कामे झाली नसून अनेक कामे अपूर्ण असणे, ब्रास रॉयल्टीची रक्कम व आदिवासी जमीन नजराण्याची रक्कम शासनास जमा न करणे इत्यादी तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच स्थानिक नागरिकांनी लेखी निवेदनाद्वारे मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री (जि.पालघर), जिल्हाधिकारी, पालघर व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांचेकडे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार रस्त्याचे काम पुर्ण न करणाऱ्या सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर कंत्राटदार कंपनीविरुध्द तसेच मा.न्यायालयात असत्य माहिती देणाऱ्या मेरी संस्थेच्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय

(२) कंत्राटदाराने शासनाच्या रॉयल्टी पोटी रक्कम रू.६.२१ कोटी इतकी रक्कम भरलेली असून चलनाच्या सत्यप्रती विभागास सादर केल्या आहेत. सदर चलनाची सत्यता पडताळण्यासाठी जिल्हाधिकारी, पालघर यांना सादर केले आहे.

तसेच आदिवासी जमीन नजराण्याची ४०.५८ लक्ष इतकी रक्कम विभागाकडे भूसंपादनापोटी जमा केलेल्या रकमेतून भरणेबाबत जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडून खुलासा घेऊन उपलब्ध अनुदानातून शासनास जमा करण्यात येईल.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मेरी या संस्थेमार्फत सदर रस्त्याच्या कामाची दर १५ दिवसांनी पाहणी करण्यात येते व त्याचा अहवाल मा.उच्च न्यायालयास परस्पर सादर करण्यात येतो. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) होय.

(४) मा.उच्च न्यायालयाने मेरी संस्थेस दर १५ दिवसानी कंत्राटदार करीत असलेल्या दुरूस्तीच्या कामाबाबत अहवाल देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार मेरी संस्थेकडून अहवाल सादर केला जातो. सध्या ही बाब न्यायप्रविष्ठ आहे.

तसेच मा.न्यायालयात असत्य माहिती दिली असल्याबाबत निदर्शनास आलेले नाही. त्यामुळे मेरी संस्थेच्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणतीही कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वांद्रे (पू), मुंबई येथे अभियांत्रिकी महाविद्यालय व वसतिगृह बांधण्यासाठी दिलेला भूखंड खाजगी विकासकाला विकल्याबाबत**

**(३१) * २६७१७ श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पू), मुंबई येथे अभियांत्रिकी महाविद्यालय व वसतिगृह बांधण्यासाठी सर्व्हे नं.३४१ मधील दिलेला भूखंडाचा काही भाग खाजगी विकासकाला विकल्याच्या तक्रारी शासनाकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई (उपनगर) यांच्याकडुन अहवाल मागविण्यात आला असुन अहवाल अप्राप्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशा आशयाच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(२) व (३) सदरहू तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने मराठवाडा मित्र मंडळ या संस्थेस नोटीस दिली असून त्यानुषंगाने सुनावणी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## तुमसर (जि.भंडारा) तालुक्यातील वैनगंगा नदीवरील बामणी रेती घाटावरील वाळू उपसा रोखण्याबाबत

**(३२) * २९०८५ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर (जि.भंडारा) तालुक्यातील वैनगंगा नदीवरील बामणी रेती घाटावर पोकलॅन व जेसीबीच्या सहाय्याने अधिकारी व वाळु माफिया यांच्या संगनमताने अवैधरित्या रेती उत्खनन करण्यात येत असल्याचे दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधित अधिकारी व अवैध वाळू उपसा करणाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) भंडारा जिल्ह्यातील मौजा बामणी, तालुका तुमसर येथील वैनगंगा नदीवरील रेतीघाट वर्ष २०१६-२०१७ करीता लिलावात गेला असून, सदर रेतीघाटाची दिनांक ५/०२/२०१७ रोजी आकस्मिक तपासणी केली असता, सदर रेतीघाटात दोन पोकलॅन आढळून आले.

सदर दोन्ही पोकलॅन जप्त करुन संबंधित लिलावधारकाची सुरक्षा ठेव रक्कम व बँक गॅरंटी शासनजमा करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ठिबक व तुषार सिंचनाचा निधी शेतकऱ्यांना अदा करण्याबाबत

**(३३) * २६७७६ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मागील वर्षाच्या दुष्काळी परिस्थितीत शासनाने शेतकऱ्यांना ठिबक व तुषार सिंचन घेण्याचे सांगून याबाबत त्यांना अनुदान देण्यात येणार असल्याचे घोषित केल्यामुळे शेतकऱ्यांनी घरातील सोने विकून, व्याजाने पैसे काढून पूर्ण रक्कम भरुन ठिबक व तुषार संच घेतलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात २५ जिल्ह्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांसाठी ठिबक आणि तुषार सिंचनावरील अल्पभूधारकांसाठी ६० टक्के व बहुभूधारकांसाठी ५० टक्के अनुदानाचा उपलब्ध निधी शासनाच्या दुर्लक्षपणामुळे प्रलंबित राहिल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शेतकऱ्यांना ठिबक व तुषार सिंचनाचा प्रलंबित निधी अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१), (२) व (३) राज्यात केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना राबविण्यात येत आहे. सन २०१३-१४ पर्यंत सदर योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ६०% व इतर शेतकऱ्यांना ५०% एवढे अनुदान देण्यात येत होते. सन २०१४-१५ पासून सदर योजनेंतर्गत ३५% ते ६०% च्या दरम्यान अनुदान देण्यात येते.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे पुरेशे लाभार्थी उपलब्ध न झाल्याने सदर प्रवर्गासाठीच्या केंद्र हिश्श्याच्या उपलब्ध निधीपैकी सन २०१३-१४, २०१४-१५ व २०१५-१६ या वर्षातील अनुक्रमे रु.३९.१७ कोटी, रु.३२.८९ कोटी व रु.१४.४६ कोटी अखर्चित राहिला आहे. त्याचप्रमाणे पूर्वसंमती दिलेल्या सर्वसाधारण प्रवर्गातील काही लाभार्थ्यांनी सूक्ष्म सिंचन संचाची उभारणी न केल्यामुळे सदर प्रवर्गासाठीचा केंद्र हिश्श्याचा सन २०१४-१५ या वर्षातील रु.७.२४ कोटी व सन २०१५-१६ या वर्षातील रु. ४.०५ कोटी एवढा निधी शिल्लक राहिलेला आहे.

सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षातील पूर्वसंमती दिलेले अंदाजे अनुक्रमे रु.१२६ कोटी व रु.५२ कोटी असे एकूण रु.१७८ कोटी एवढ्या रक्कमेचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. निधी उपलब्धतेनुसार सदर प्रस्ताव निकाली काढण्यात येतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**~~दारफळ ते कळमण (ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर)~~**
**~~या रस्त्याची झालेली दुरवस्था~~**

~~**(३४) * २७९२३ श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-~~

"मा.सदस्यांचे सदस्यत्व निलंबित करण्यात आल्याने प्रश्न वगळण्यात आला आहे."

**नांदेड जिल्हयातील नदीपात्रातील अवैध वाळु उपसा रोखण्याबाबत**

**(३५) * २९०४७ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंजगाव, हुणगुंदा, माचनूर, सगरोळी, यसगी, कारला, नागणी (ता.बिलोली, जि.नांदेड) व सोनाळा, शेकापूर, शेळगाव (ता.देगलूर, जि.नांदेड) ही गावे तेलंगणा व कर्नाटक राज्याच्या सीमेवर असून मांजरा नदीपात्रातून प्रशासनाच्या संगनमताने व निष्काळजीपणामुळे दिवस-रात्र जे.सी.बी. मशीनच्या सहाय्याने राजरोसपणे वाळु उपसा होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अवैध वाळु उपसा रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) नांदेड जिल्हयातील बिलोली व देगलूर तालुक्यात वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

नांदेड जिल्हयात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी तालुकास्तरावर भरारी पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच अवैध रेती वाहतूकीस प्रतिबंध आणण्याच्या दृष्टीने चेकपोस्ट स्थापन करण्यात आले असून, तेथे २४ तास पथक कार्यरत ठेवण्यात आले आहे. एप्रिल, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत केलेल्या तपासणीमध्ये वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत देगलूर तालुक्यात १२६ प्रकरणांत रू. २६,६३,९७२/- व बिलोली तालुक्यात १४५ प्रकरणांत रू. ५१,२५,५००/- एवढा दंड वसूल केला आहे. तसेच देगलूर तालुक्यात ९ प्रकरणांत व बिलोली तालुक्यात ३९ प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तथापि, प्रशासनाच्या संगनमताने व निष्काळजीपणामुळे वाळूचा उपसा होत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुरूड बंदरावर (ता.मुरूड, जि.रायगड) मच्छिमार जेट्टी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३६) * २८१०३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरूड बंदरावर (ता.मुरूड, जि.रायगड) मच्छिमारांना नौका लावण्यासाठी व मच्छी उतरविण्यासाठी जेट्टी उपलब्ध नसल्यामुळे मच्छिमारांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुरूड किनाऱ्यावर मासळी साठविण्यासाठी कोल्ड स्टोअरेज नसल्यामुळे मच्छिसाठी लागणारा बर्फ देखील बाहेरून आणावा लागतो, तसेच मुरूड बंदरावर जेट्टी नसल्यामुळे एकदरा पुलावरून कसरत करून मच्छिमार बांधवांना बर्फ बोटीवर आणावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मुरूड बंदरावर मच्छिमार जेट्टी बांधण्यासाठी व कोल्ड स्टोअरेजबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय.
(२) होय.
(३) रा.कृ.वि. योजना सन २०११-१२ अंतर्गत मुरुड, ता.मुरुड, जि.रायगड येथे मच्छिमारांसाठी मासे उतरविण्यासाठी मुलभूत सुविधा पुरविणे व जेट्टीचे बांधकाम करण्यासाठी शासन निर्णय क्र. मत्स्यवि-२०११/प्र.क्र.२८७/पदुम-१४, दि.१५/१२/२०११ अन्वये रु.१७८.४९ लक्ष इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास व आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर बांधकाम प्रगतीपथावर आहे. केंद्र शासनाच्या नीलक्राती योजना, रासविनि मार्फत बर्फ कारखाने उभारण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येते. मुरुड किनाऱ्यावरील कार्यरत क्रियाशील मच्छिमार किंवा मच्छिमार सहकार संस्था यांच्याकडून बर्फ कारखाने उभारणीचा असा प्रस्ताव अद्यापी प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३७) * २७३४८ श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक १७६६३ ला दिनांक १४ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने गोसीखुर्द प्रकल्पामुळे बाधीत झालेल्यांचे पुनर्वसन करण्यासाठी रुपये २४० कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुनर्वसित गावामध्ये पिण्याचे पाणी, पाणीपुरवठ्याची पाईपलाईन, रस्ते, सांडपाणी, दवाखाना व वीज पुरवठा आदि मुलभूत सुविधांची निर्मिती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गोसीखुर्द प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांचे पूर्ण क्षमतेने पुनर्वसन करणेबाबत तसेच त्यांना प्राथमिक सोयीसुविधा पुरविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

गोसीखुर्द प्रकल्पामुळे बाधीत झालेल्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने पुनर्वसित गावठाणातील नागरी सुविधेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी शासन निर्णय क्र.२०१५/(५९३/२०१५)/मोप्र-२, जलसंपदा विभाग दिनांक २९/०८/२०१६ अन्वये रुपये २५७.६५ कोटीचे खर्चास मान्यता प्रदान केली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) गोसीखुर्द प्रकल्पामध्ये पुनर्वसन गावठाणात १८ नागरी सुविधा निर्माण करण्यात आल्या असून, दर्जेदार पुनर्वसन व्हावे यादृष्टीने शासनाने सुविधांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिला असून, कामे प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**येवला व निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालये-निवासस्थाने बांधण्याच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**

**(३८) * २७१७७ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला तालुक्यातील ३० गावांमध्ये तसेच निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील १९ गावांमध्ये तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालये-निवासस्थाने बांधण्याकरिता अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी अनुक्रमे दिनांक २८ मार्च, २०१६ व दिनांक ८ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त, नाशिक यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला असून निधी व प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केल्याचे दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नाशिक जिल्ह्यात तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालये-निवासस्थाने बांधण्याकरिता आवश्यक प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय खरे आहे.

(२) व (३) येवला तालुका जि.नाशिक मधील ३० गावांमध्ये तलाठी व मंडळ अधिकारी यांचे कार्यालय व निवासस्थान बांधण्याकरीता तसेच निफाड तालुका जि.नाशिक यामधील १९ गावांमध्ये तलाठी कार्यालये व निवासस्थाने बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याविषयी विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करण्यात येत असून काही मुद्यांबाबत अधिकची माहिती विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांच्या कार्यालयाकडून मागविण्यात आली आहे.

-----------------

**कृषी विभागाच्या विविध योजनांच्या प्रस्तावाबाबत**

**(३९) * २६८०९ डॉ.अपूर्व हिरे, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २४११५ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१६-२०१७ हे वर्ष "शेतकरी स्वाभिमान वर्ष" म्हणून जाहिर करण्यात येवून मा.वित्त मंत्री यांनी नविन पंडीत दीनदयाळ उपाध्याय कृषी मार्गदर्शक योजना, कृषी गुरूकुल योजना, कृषी महोत्सव योजना, राज्य कृषी व अन्न प्रक्रिया योजना, सेंद्रीय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना ह्या सहा शंभर टक्के राज्य कृषी योजना घोषित करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात प्रस्तावित शंभर टक्के राज्य योजनांसाठी नियोजन विभागाने एकूण रु.१५०/- कोटी एवढा नियतव्यय उपलब्ध करून दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील नविन सहा योजनांचे शासनाचे विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय व सदर योजनांचे प्रस्तावास मा.मंत्रीमंडळाने मान्यता प्रदान केली आहे काय, सदरहु योजनांना केव्हापर्यंत मान्यता मिळणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, सदरील योजनाचे प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय, हे खरे आहे

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदरील सहा नवीन योजनापैकी कृषी महोत्सव योजना व डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना या दोन योजना राबविण्यास दिनांक ३/१/२०१७ रोजी मा.मंत्रीमंडळाने मान्यता प्रदान केली आहे. पंडीत दीनदयाळ उपाध्याय कृषी मार्गदर्शक व कृषी गुरुकुल योजना या दोन नवीन योजना स्वतंत्रपणे न राबविता सदर दोन योजनामधील प्रस्तावित कार्यक्रम आत्मा या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील आत्मा या स्वायत्त संस्थामार्फ़त राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच राज्य कृषी व अन्न प्रक्रिया योजना व सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र या दोन योजनांचे प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहेत.

(४) व (५) कृषी महोत्सव योजना व डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना या दोन योजना राबविण्यास दिनांक ३/१/२०१७ रोजी मा.मंत्रीमंडळाने मान्यता प्रदान केली आहे. तद्नूसार कृषी महोत्सव योजनेस मान्यतेचे आदेश दिनांक ५/१/२०१७ रोजी तर सदर योजना राबविण्यासाठीचे प्रशासकीय मान्यता आदेश दिनांक ७/१/२०१७ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेस मान्यता व प्रशासकीय मान्यतेचे आदेश दिनांक ५/१/२०१७ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. राज्य कृषी व अन्न प्रक्रिया योजना व सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र योजना या दोन योजनांचे प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्यामुळे प्रस्तुत योजनांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या अनुषंगाने कार्यवाहीचा व तद्नुषंगाने विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही .

-----------------

## मुंबई-पुणे महामार्गावरील रस्ते अपघातात झालेली वाढ

**(४०) * २७२६७ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.रविंद्र फाटक, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.सुनिल तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रस्ते अपघातात गत वर्षाच्या तुलनेत १५६ ने वाढ झाली असून मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर तसेच, मुंबईच्या रस्त्यांवरील अपघातांच्या संख्येत सन २०१५ च्या तुलनेत सन २०१६ या वर्षात वाढ झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील मुंबई-पुणे महामार्गावरील अपघात रोखण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही.

पोलीस विभागाकडून प्राप्त झालेल्या मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील अपघातांच्या आकडेवारीनुसार वर्ष २०१५ मधील एकूण ३१३ अपघातांच्या तुलनेत जानेवारी ते ऑक्टोबर २०१६ पर्यंत (१० महिन्यात) एकूण २४३ अपघात झालेले असून एकूण अपघातात गेल्या दहा वर्षात सातत्याने घट झालेली दिसून येते.

(२) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर अपघात होऊ नये म्हणून सूचना फलक, वळण फलक, दिशादर्शक फलक, पांढऱ्या रंगाचे पट्टे, थरमोप्लॅस्टीक पेंटचे पट्टे, झेब्रा क्रॉसींग, डेलीनेटर, कॅटाईज इ. उपाययोजना करण्यात आली आहे.

विशेष उपाययोजना म्हणून २०१२ ते २०१४ या वर्षात अपघात प्रवण सुमारे १४ कि.मी. लांबीत आधुनिक स्टील वायर रोप क्रॅश बेरियर बसविण्यात आले आहे. अपघातप्रवण लांबीमध्ये (२५ कि.मी.) हायटेन्साईल वायर रोप क्रॅश बॅरीअर बसविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. उर्वरित संपूर्ण लांबीमध्ये या प्रकारचे वायर रोप लावण्याचे नियोजित आहे.

तसेच घाटाच्या लांबीत दरडी कोसळून अपघात रोखण्यासाठी अँकर बोल्टिंक सह वायर रोप लावण्याचे काम प्रगतीत आहे.

जे. पी. रिसर्च इंडिया प्रा.लि. या संस्थेकडून द्रुतगती मार्गावरील अपघात रोखण्यासाठी सर्व्हेक्षण करुन तसा अहवाल पोलिसांकडून घेण्यात आला असून त्यानुसार उपाययोजना कार्यान्वित करण्यात येत आहे. दिनांक २३/०२/२०१६ रोजी सेव्ह लाईफ फाऊंडेशन, महिंद्रा ॲन्ड महिंद्रा व मराराविम (मर्या.) यांचे समवेत द्रुतगती मार्ग 'झिरो फॅटिलिटी' कॉरिडॉर करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवळी-ठुणावे (ता.वाडा, जि.पालघर) या रस्त्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४१) * २९३०६ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळी-ठुणावे (ता.वाडा, जि.पालघर) या रस्त्याचे काम न करताच सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने रस्त्यांचे काम केल्याचे दाखवत बोगस बिले काढून रूपये तीन लाखांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी व ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

विषयांकीत रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरात एस.टी. महामंडळाने बससेवा बंद करण्याचा घेतलेला निर्णय

**(४२) * २९०४१ श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात बससेवा चालविताना गेल्या पाच वर्षात महामंडळाला रुपये १५ कोटींचा तोटा झाला असून त्याची भरपाई करावी अन्यथा दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ रोजी पासून शहर बससेवा बंद केली जाईल असा इशारा एस.टी. महामंडळाने महापालिकेला दिला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीत शहर बसमधून ३ हजार पासधारक विद्यार्थ्यांची वाहतूक होत असून या सर्व पासचे नुतनीकरण थांबविण्याची तयारी महामंडळाने केली आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या वाहतूकीचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेऊन या विद्यार्थ्यांच्या वाहतूकीचा प्रश्न सोडविण्यासाठी कोणती पर्यायी व्यवस्था केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाद्वारे चालविण्यात येणारी औरंगाबाद येथील शहर बस वाहतूक अद्याप बंद केलेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या वाहतूकीचा कोणत्याही प्रकारचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पॉलीहाऊस-जरबेरा उत्पादक शेतकरी (जि.उस्मानाबाद) येथील शेतकऱ्यांचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत**

**(४३) * २८१५५ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पॉलीहाऊस-जरबेरा उत्पादक शेतकरी (जि.उस्मानाबाद) येथील शेतकऱ्यांना सन २०१५-१६ चे अनुदान मिळाले नसल्याने शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अनुदान मिळण्याकरीता शेतकऱ्यांनी मा.पालकमंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार करून कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शेतकऱ्यांचे सन २०१५-१६ चे प्रलंबित अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) उस्मानाबाद जिल्ह्यातील सन २०१५-१६ मधील पूर्वसंमती दिलेल्या हरितगृह उभारणी घटकाचे व जरबेरा लागवड साहित्याचे काही शेतकऱ्यांचे अनुदान प्रलंबित आहे.

(२), (३) व (४) सन २०१५-१६ मधील पूर्वसंमती दिलेल्या हरितगृह व जरबेरा लागवड साहित्य यांचे प्रलंबित अनुदान, सन २०१६-१७ मध्ये एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान व राष्ट्रीय कृषी विकास योजनांतर्गत मंजूर करण्यात आलेल्या निधीमधून वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**राज्यातील अप्रमाणित खतांचे उत्पादन बंद करण्याबाबत**

**(४४) * २६८८० श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अप्रमाणित खतांची मोठया प्रमाणात उत्पादन होत असल्याने सदर खतांची तपासणी करण्यासाठी दिनांक २७ जून, २०१६ ते ३१ जुलै, २०१६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या मोहिमेत दुय्यम मिश्र खतांच्या ५४४ नमुन्यांपैकी ५०८ नमुने अप्रमाणित असल्याचे निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अप्रमाणित खतांचे उत्पादन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.

(२) प्रस्तुत प्रकरणी खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतूदींचे उल्लंघन झाल्याने संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देवून खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतुदीनुसार संबंधितांवर कारवाई सुरू आहे. १८७६.२२ मे.टन साठ्यास व ८० दुकांनाना विक्री बंद आदेश देण्यात आले आहेत. कायद्यातील तरतूदीचे उल्लंघन झाल्याने ६४ परवाने निलंबित करण्यात आलेले आहेत.

या विषयाबाबत दिनांक १२/०१/२०१७ रोजी आयोजित केलेल्या राज्य खत समितीच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, ग्रेड निराधिसुचित करण्याचा प्रस्ताव कृषी आयुक्तालयाकडून शासनास प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पाटण (जि.सातारा) तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत**

**(४५) * २७३९८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यातील ढेबेवाडी खोऱ्यातील वांगमराठवाडी येथील प्रकल्पग्रस्तांना जमीन वाटप करण्यात येत नसल्याने प्रजासत्ताक दिनी (२६ जानेवारी, २०१७) रोजी प्रकल्पग्रस्तांनी मा.महसूल, पुनर्वसन मंत्री यांच्या कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिनांक २० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार प्रकल्पग्रस्तांना जमिनीचे वाटपाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

केकतवाडी (मेंढ), ता.पाटण येथील ८ प्रकल्पग्रस्तांनी दि. २६ जानेवारी, २०१७ रोजी आत्मदहन करणार असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१७ च्या निवेदनाद्वारे कळविले होते.

(२) वांग मराठवाडी प्रकल्पांतर्गत मौजे मेंढ व केकतवाडी या गावांचे पुनर्वसन शिवाजीनगर, ता.कडेगाव, जि.सांगली येथे करण्याचे नियोजन आहे. सदर अर्जदारांनी वेळोवेळी मागणी केल्यानुसार मौजे कोळे, ता.कराड, जि.सातारा येथे रहिवासाकरीता भूखंड वाटप करण्यात आलेले आहेत. मूळ नियोजनानुसार सांगली जिल्हयातील पर्यायी जमिनींची पसंती देण्याबाबत जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सांगली यांनी प्रकल्पग्रस्तांना कळविले आहे. तथापि, अर्जदार त्यांना सातारा जिल्हयात पर्यायी जमिनी मिळाव्यात अशी मागणी करीत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण-अहमदनगर महामार्गावरील माळशेज घाटाची झालेली दुरवस्था**

**(४६) * २८२७५ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-अहमदनगर महामार्गावरील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २२२ वरील माळशेज घाटात दरड कोसळणे, रस्ते खचणे, रस्त्याला भेगा पडणे, साईडपट्ट्या दुरवस्थेत असणे, कोसळलेल्या संरक्षक भिंती, धोकादायक सूचनांचे फलक नसणे, जागोजागी डांबराची पिंपे, लाईनीत सुरू केलेली एकेरी वाहतुक यामुळे माळशेज घाट वाहतुकीसाठी धोकादायक झाला असून घाटात जिवित व वित्त हानी झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घाटाच्या संरक्षण भिंतीलगत रिलायन्स कंपनीने मोठमोठ्या केबल टाकण्यासाठी खोदकाम केले असून या घाटात वर्षभर सुशोभिकरणाच्या नावाखाली केल्या जाणाऱ्या स्फोटामुळे घाट ठिसूळ बनून कोसळत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याणहून अहमदनगर व पुण्याकडे येण्या-जाण्यासाठी माळशेज घाट हा एकमेव पर्याय असून या घाटात कोणतीही सुरक्षितता नसल्यामुळे या घाटात वारंवार अपघात होत असून या घाटात सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नसून घाट परिसरात अपघात झाल्यास रूग्णवाहिका, अग्निशमनदल, जेसीबी, गिर्यारोहक टीम, आरोग्य उपचार यंत्रणा इत्यादी कोणतीही सोयी-सुविधा नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार माळशेज घाटाची सुरक्षितता वाढवून सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

कल्याण अहमदनगर महामार्गावरील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २२२ वरील माळशेज घाटात जानेवारी, २०१७ मध्ये कुठल्याही प्रकारची जिवित वा वित्त हानी झालेली नाही.

तथापि अतिवृष्टीमुळे दरड कोसळल्याने जुलै, २०१६ मध्ये चालकासह ट्रक दरीमध्ये कोसळल्याने एक व्यक्ती बेपत्ता आहे. तसेच दरड काढण्यासाठी वित्तहानी झालेली आहे.

माळशेज घाटात कोसळलेल्या संरक्षक भिंतीच्या ठिकाणी काम सुरु असल्याने दोन ठिकाणी सुमारे ४०० मी. लांबीत डांबराची पिंपे ठेवून एकेरी वाहतूक सुरळीत सुरु आहे. धोकादायक सुचनांचे फलक लावण्यात आले असून सद्य:स्थितीत माळशेज घाटातील वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने सर्वतोपरी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

मागील दोन वर्षात माळशेज घाटात रिलायन्स कंपनीच्या केबल टाकण्यास परवानगी दिलेली नाही. तसेच घाट सुशोभिकरणाचे कोणतेही काम करण्यात आलेले नाही.

(३) हे खरे नाही.

सन २०११ नंतर माळशेज घाटामध्ये दरीकडील व डोंगराकडील बाजूला विविध ठिकाणी एकूण १३१० मी. लांबीच्या संरक्षक भिंती, तीन लहान पूलांचे रुंदीकरण/पूर्नबांधणी, १६ पाईप मोऱ्यांचे रुंदीकरण, २० तीव्र वळणांची सुधारणा आणि बोगद्याची सुधारणा ही कामे पूर्ण केली आहेत. माळशेज घाटातील रस्त्याची रात्री दृष्यमानता वाढण्यासाठी रस्त्याच्या दोन्हीकडेला थर्मोप्लास्टीक पेंटीग व कॅट आईज बसविण्यात आलेले आहेत. दरड कोसळू नये म्हणून घाटातील कडयावर १२०० चौ.मी. क्षेत्रामध्ये रॉक बोल्टींग करुन जाळी बसविण्यात आली आहे.

सद्यस्थितीत १०० मी. संरक्षण भिंत, ३ पाईप मोऱ्यांचे रुंदीकरण, ३ तीव्र वळणाच्या सुधारणेचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच सन २०१६-१७ मध्ये संरक्षण भिंती, रॉक बोल्टींग करुन जाळी लावण्यासाठी निविदा बोलविण्यात आली आहे. अशाप्रकारे घाटात सुरक्षिततेच्या दृष्टीने विविध उपाययोजनेची कामे नियमितपणे करण्यात येत आहेत.

महामार्गावर अपघात झाल्यास १०८ क्रमांकावर रुग्णवाहिका उपलब्ध आहे. पावसाळ्यातील चार महिने माळशेज घाटात दरडी कोसळल्यानंतर तात्काळ काढून वाहतूक सुरु करण्यासाठी जेसीबी कार्यरत असतो.

(४) माळशेज घाटामध्ये रस्ते सुरक्षाविषयक कामे टप्प्याटप्प्याने निधी उपलब्धतेनुसार दरवर्षी हाती घेण्यात येत असतात. तसेच कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून माळशेज घाटातील महामार्गाचे रुंदीकरण व बोगदा काढण्याच्या दृष्टीने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(४७) * २६७५२ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील प्रमुख रस्ते खड्डेमय झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मालवण कार्यालयात ५ पैकी ३ कनिष्ठ अभियंत्यांची तर ३ स्थापत्य अभियंते यांची पदे रिक्त आहेत, ६० रस्ता कामगारांपैकी केवळ १५ कामगार असून ४५ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सार्वजनिक बांधकाम उप विभाग कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत तसेच मालवण तालुक्यातील रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

तथापि मालवण तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्यांच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे भरण्यात आले आहेत. रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(२) सार्वजनिक बांधकाम उपविभाग मालवण कार्यालयात मंजूर ४ पैंकी २ कनिष्ठ अभियंता, ५ पैंकी २ स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक व २४ मैल मंजूरांपैकी १९ मैल मजूर कार्यरत आहेत.

(३) व (४) रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

**वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याबाबत**

**(४८) * २८२८८ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी (जि.यवतमाळ) तालुक्यात मागील १२ वर्षात २८९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वणी तालुक्यातील फक्त ६२ शेतकऱ्यांच्या कुटूंबाला शासकीय आर्थिक लाभासाठी पात्र ठरविण्यात आले तर उर्वरित २१७ शेतकऱ्याचे कुटुंबाला अपात्र ठरविण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अपात्र ठरलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याबाबत व शेतकरी आत्महत्या रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अशंत: खरे आहे.

वणी तालुक्यात सन २००५ ते सन २०१६ या कालावधीत २६४ शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपैकी ५९ प्रकरणे पात्र तर २०५ अपात्र प्रकरणे ठरविण्यात आली आहेत.
(३) शेतकरी आत्महत्यांप्रकरणी अपात्र प्रकरणांना आर्थिक मदत अनुज्ञेय नाही. तसेच दिनांक २३/१/२००६ च्या शासन निर्णयानुसार पात्र प्रकरणी रुपये १ लक्ष सानुग्रह अनुदान देण्यात येते. वाढत्या शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये प्रायोगिक तत्वावर बळीराजा चेतना अभियान राबविण्यात येत असून कै.वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशन अंतर्गत अमरावती व मराठवाडा विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा जिल्हा अशा १४ जिल्ह्यांमध्ये शेतकरी आत्महत्या रोखणेबाबतच्या उपाययोजना राबविण्याबद्दल कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नविन जिल्हे व तालुके निर्मितीबाबत

**(४९) * २७८४० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.अपूर्व हिरे, श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक २३७०३ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा विभाजनाबाबत निकष निश्चित करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांच्या समितीने सादर केलेला अंतिम अहवाल शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येऊन तालुका विभाजनाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, कोकण यांच्या समितीने सादर केलेल्या अहवालावरून निकष निश्चित करण्याबाबतची सुरू करण्यात आलेली प्रक्रिया पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनस्तरावर मंत्रीमंडळाच्या मान्यतेने जिल्हा विभाजनाबाबत निकषांची निश्चिती करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोरगांव मंजू येथे स्वतंत्र तहसिलदारांची नियुक्ती करण्यात येणार आहे काय तसेच नाशिक व अन्य जिल्ह्यांचे विभाजन/पुर्नरचनेबाबत तसेच नविन मालेगांव जिल्हा निमिर्तीबाबत कोणता निर्णय घेण्यात आलेला आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील नवीन जिल्हे व तालुका विभाजनाचे निकष निश्चित करून नविन तालुका निर्मितीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) जिल्हा विभाजनाबाबत निकष निश्चित करण्याकरीता अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून तपासणीअंती धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे. मंत्रीमंडळाच्या मान्यतेने निश्चित केल्या जाणाऱ्या धोरणानुसार / निकषानुसार नाशिक जिल्ह्याचे तसेच अन्य जिल्ह्यांचे विभाजन / पुर्नरचने संदर्भात प्रकरणपरत्वे उचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. प्राप्त अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांकडून मागविण्यात आलेले अभिप्राय प्राप्त झाले असून त्यांचा विचार करुन तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्याकामी धोरण अंतिम करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. सदर धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे सायतखर्डा (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) साठवण तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत**

**(५०) * २८४६८ श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.रामराव वडकुते, श्री.आनंद ठाकूर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सायतखर्डा (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) साठवण तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) भुसंपादन प्रस्तावाची रितसर प्रक्रिया प्रगतीत आहे. अद्यावत भुसंपादन कायदा, २०१३ नुसार भुसंपादन मोबदला व सरळ खरेदी करण्याबाबत भुधारकांच्या मागणीनुसार भुसंपादन मोबदला निश्चिती दिनांक ०१/०७/२०१६ रोजी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे अध्यक्षतेखालील सभेत करण्यात आलेली आहे. त्यानुसार उपलब्ध असलेल्या रुपये ३१,१४,५३३/- निधीचे भुगतान एकुण संबंधित १२ भुधारकांना करण्यात आलेले आहे.

उर्वरित भुसंपादन मोबदला रक्कम रुपये ३,०९,४०,३९२/- निधी मागणी प्रस्तावा संबंधित आवश्यक कागदपत्रे व अन्य बाबींची पुर्तता करून प्रकरणाच्या सदयस्थितीसह तातडीने शासनास सादर करण्याच्या सूचना अधिक्षक अभियंता, अमरावती मंडळ कार्यालयास दिनांक १७/०२/२०१७ च्या शासन पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जव्हार-चालतवाड-सेलवास (जि.पालघर) या तालुक्यातील रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(५१) * २७०८४ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार-चालतवाड-सेलवास (जि.पालघर) या रस्त्यांवरील खड्डे भरून, पॅच बांधून रस्त्यावरील केवळ दुरूस्तीचे बांधकाम केलेले असतांना ठेकेदार व संबंधित अधिकारी यांच्या संगनमताने उपरोक्त रस्त्यांचे नवीन बांधकाम झाल्याचे दाखवून गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रस्त्यांचे बांधकामासाठी किती रक्कमेची निविदा काढण्यात आली होती व कोणत्या ठेकेदारास बांधकामाचे काम देण्यात आले होते,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करून गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकारी व ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील पडलेले खड्डे भरण्याच्या कामाच्या रुपये १०.८४ लक्ष रकमेची निविदा निम्नतम निविदाकार श्री. राहुल विजय घोलप, जव्हार यांना देण्यात आली होती.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसमत-कौठा-कुरुंदा (जि.हिंगोली) येथील कोठा परिसरातील कॅनॉलवरील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(५२) * २८०६३ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमत-कौठा-कुरुंदा (जि.हिंगोली) येथील वाहतूक व रहदारी असलेल्या मार्गावरील कोठा परिसरातील कॅनॉलवरील पुलाचा दगडी कठडा कोसळल्याने हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक झाला असून गत वर्षातच जवळपास २५ दुचाकी कॅनॉलमध्ये पडून अपघात झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दगडी कठडाच्या दुरुस्तीबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास कळवूनही त्यांच्याकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन कॅनॉल क्रॉसिंगवरील पुलाचे बांधकाम पाटबंधारे विभागामार्फत करण्यात आले असून पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमत यांचेकडून पुलाचे नादुरूस्त झालेले दगडी कठडे दुरूस्त करण्यात आलेले आहेत. सद्य:स्थितीत पूल वाहतुकीस योग्य आहे. तसेच पुलाचे कठडे तुटल्यामुळे कोणताही अपघात झाल्याची नोंद ग्रामीण पोलीस ठाणे, वसमत यांचे दप्तरी नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात बैलगाडयांच्या शर्यतीवरील बंदी उठविण्याबाबत**

**(५३) * २६८९१ श्री.संजय दत्त, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.नारायण राणे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक १७३१७ ला दिनांक २१ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बैलगाड्यांच्या शर्यती पुन्हा सुरु होण्यासाठी मुंबईतील आझाद मैदानावर माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हयासह पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडयात बैलगाडयांच्या शर्यती होत असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात बैलगाडयांच्या शर्यती पुन्हा सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्यात बैलगाड्यांच्या शर्यतीस असलेली बंदी उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक १५/२/२०१३ रोजीच्या निर्णयास अनुसरून काही अटी व शर्तीच्या अधीन राहून दिनांक १२/३/२०१३ च्या शासन निर्णयान्वये बैलगाडा शर्यतीस परवानगी देण्यात आली होती. त्यानुसार शर्यती आयोजित करण्यात येत होत्या.

परंतु मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ७/५/२०१४ रोजीच्या अंतिम निकालास अनुसरून दिनांक ११/७/२०१४ च्या शासन निर्णयान्वये राज्यात बैलगाड्यांच्या शर्यतीस बंदी घालण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई सेंट्रल आगारातील एसटीच्या फेऱ्यांच्या सुसूत्रिकरणाच्या फेरविचाराबाबत**

**(५४) * २७९४३ ॲड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक २५७५० ला दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई सेंट्रल आगारातील एसटीच्या फेऱ्यांचे सुसूत्रिकरण करून त्यातील फेऱ्या अन्य आगारात वर्ग करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सुसूत्रिकरणामुळे चालक-वाहकांना त्रास होत असल्याने सुसूत्रिकरणा विरोधात मुंबई सेंट्रल आगारातील एसटीच्या ३२० चालक-वाहकांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सुसूत्रिकरणाचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे तसेच सुसूत्रिकरणाचा फेरविचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) होय.
(३) प्रवाशांना वक्तशीर सुविधा मिळण्यासाठी तसेच महामंडळाच्या खर्चात कपात व उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून राज्य परिवहन महामंडळाकडून वाहतूकीचे सुसूत्रिकरण करण्यात येते. त्याप्रमाणे मुंबई-सातारा मार्गाचे सुसूत्रिकरण करुन सदर मार्गावरील फेऱ्या सातारा आगाराकडे वर्ग करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या फेऱ्या पूर्वीप्रमाणेच चालविणेबाबत चालक/वाहकांकडून मागणी करण्यात आली आहे, परंतू सदरच्या फेऱ्या पुर्वीप्रमाणे मुंबई आगारामार्फत चालविणे प्रवासी व महामंडळाच्या दृष्टीने हितावह नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर जिल्ह्यात कुंभार समाजाकरिता आरक्षित**
**जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५५) * २७०२६ प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कुंभार समाजाला माती उत्खननाकरीता महाराष्ट्र जमीन महसूल अधिनिय १९७१ मधील नियम ३१ नुसार २ ते १५ एकर जमीन आरक्षित असतांना नागपूर जिल्ह्यात शासकीय रेकार्डवर राखीव जागा उपलब्ध नसल्याचे दिनांक २३ मार्च, २०१२ च्या माहिती वरून महाराष्ट्र कुंभार महासंघास दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कुंभार समाजासाठी नियमानुसार आरक्षित जमीन उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) महसूल व वन विभाग, शासन पत्र क्र. विसप्र १०९८ /प्र.क्र.३ /समन्वय/ (समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग)/ज-१, दिनांक २८/१०/१९९८ अन्वये “कुंभार व्यवसायासाठी कुंभार समाजापैकी कोणाची सरकारी जमिनीची मागणी असल्यास त्यावर महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ मधील नियम ३१ अन्वये अग्रक्रमाने कार्यवाही करण्यात यावी” असे निर्देश देण्यात आले आहेत.

नागपूर जिल्ह्यात पारशिवनी तालुक्यातील मौजा पारशिवनी येथील स. नं. ४३३, ४३६ या शासकीय जमिनीच्या गा. न. नं. ७/१२ च्या इतर अधिकारात "मातीची भांडी तयार करण्याकरिता व माती करता मुकर्रर" असल्याची नोंद आहे. नागपूर जिल्ह्यातील इतर तालुक्यात अशी नोंद आढळून आलेली नाही.

उक्त दिनांक २८/१०/१९९८ च्या शासन पत्रानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, नागपूर यांनी जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना दिल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खरीप आणि रब्बी हंगामातील दुष्काळ बाधित शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत**

**(५६) * २९१३४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सन २०१५ च्या खरीप आणि रब्बी हंगामातील दुष्काळ बाधित ३० हजार गावातील शेतकऱ्यांना सुमारे रूपये १७०० कोटी मदत देण्याचा निर्णय मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांनी घेतला असल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.

खरीप सन २०१५ मधील कापूस व सोयाबीन बाधित शेतकऱ्यांसाठी महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.एससीवाय-१२/२०१५/ प्र.क्र.१८७/म-११ दिनांक ६ जानेवारी, २०१५ अन्वये रुपये १२९६.१० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

सन २०१५ च्या रब्बी हंगामातील बाधित शेतक-यांना महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एससीवाय-२०१६/प्र.क्र.२१९/म-७ दिनांक २९ डिसेंबर, २०१६ अन्वये पीक नुकसानीवर मदत जाहीर करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दोडामार्ग-कोल्हापूर-बेळगाव-गोवा या महामार्गावरील तिलारी घाटाच्या दुरुस्तीबाबत**

**(५७) * २८५०२ श्री.रामहरी रुपनवर, श्री.नारायण राणे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक १४१६६ ला दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग-कोल्हापूर-बेळगाव-गोवा या महामार्गादरम्यान असलेल्या तिलारी घाटात रस्ते खचणे, रस्त्याला भेगा पडणे, रस्त्यात मोठे खड्डे असणे तसेच या घाटातून होत असलेल्या खडी वाहतुकीमुळे घाटात वारंवार अपघात होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार घाटातील खडी वाहतूक थांबवून या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) घाट रस्त्यांपैकी ७.२० कि.मी. लांबीचा रस्ता जलसंपदा विभागाने धरण प्रकल्पाच्या कामासाठी बांधलेला आहे. हा रस्ता जलसंपदा विभागाच्या अखत्यारीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खेड शिवापूर (जि.पुणे) टोल नाक्यावर अनधिकृतरित्या टोल वसूली सुरु असल्याबाबत**

**(५८) * २६९२६ श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड शिवापूर (जि.पुणे) टोल नाक्यावर टोल माफ असतानाही स्थानिक पोलीस प्रशासनाच्या संगनमताने वाहन चालकांकडून टोल वसुली केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अनधिकृतरित्या टोल वसूली करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्यामार्फत राष्ट्रीय महामार्ग क्र.४ वर पुणे-सातारा चौपदरीकरणाचे काम पूर्ण झालेले असून सहा पदरीकरणाचे काम प्रगतीत आहे. पुणे सातारा ह्या महामार्गामध्ये दोन पथकर नाके आहेत. सदर पथकर नाक्यावर पथकर वसूली वाहनांकडून सवलतदाराच्या करारानूसार करण्यात येत आहे. ह्या दोन पथकर नाक्यापैकी खेड शिवापूर पथकर नाका आहे. तेथे कोणत्याही प्रकारे गैर पध्दतीने टोल वसुली केली नसल्याचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईच्या एम.ई.पी. इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचे टोल नाक्यांचे कंत्राट रद्द करण्याबाबत**

**(५९) * २६७१८ श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक १७२६६ ला दिनांक १७ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईच्या पाच प्रवेशद्वारावरील एम.इ.पी. इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला रुपये ११७६ कोटी प्राप्त झाले असून टोल आणि वाहनांच्या संख्येत दरवर्षी होणारी वाढ लक्षात घेता, १६ वर्षाच्या टोलवसुलीच्या ठेक्यास कंपनीस तिप्पट नफा होणार नाही असे यापूर्वीच्या प्रश्नास मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांनी उत्तर दिले असून माहे ऑगस्ट, २०१५ पर्यंत रुपये १३६२.५९ कोटी इतकी रक्कम जमा झाले असून या टोलमधुन पुढील वर्षात प्रकल्पाची मुळ किंमत खर्च रुपये २१०० कोटी वसुल होणार असल्यामुळे टोल वसुलीचे कंत्राट रद्द करण्याची कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल सादर झाला आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून समितीच्या अहवालानुसार मुंबईच्या एम.ई.पी. इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचे टोल नाक्यांचे कंत्राट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**मु.पो. पातेपिलवली तर्फे वेलंब (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील मुख्य रस्ता ते बौध्दवाडी रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(६०) * २९०९२ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मु.पो. पातेपिलवली तर्फे वेलंब (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील मुख्य रस्ता ते बौध्दवाडी या दरम्यानचा रस्ता दगड-मातीचा असून सदर रस्त्याची दुरवस्था झाल्याने वृध्द नागरिक, गरोदर महिला तसेच रूग्णाचे हाल होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक नागरिकांनी शासनाकडे निवेदन/विनंती अर्जाद्वारे मागणी केली असता तत्कालिन सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी सदरहू रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम करण्यात येईल असे आश्वासित केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मुख्य रस्ता ते बौध्दवाडी या रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम यांच्याकडे सदर विषयाबाबतचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) सदर रस्त्याची पहाणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम ३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०१६-१७ मध्ये मंजूर करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळाद्‌वारे वातानुकूलित दुमजली (डबलडेकर) बसेस सुरु करण्याबाबत

**(६१) * २६७७८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रवासी क्षमता वाढविताना एसटीचा परिचालन खर्च कमी व्हावा याकरिता म.रा.प. महामंडळाकडून दुमजली बस प्रवाशांच्या ताफ्यात आणण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रलंबित असलेल्या वातानुकूलित डबलडेकर बस प्रवाशांच्या ताफ्यात आणण्याकरीता तांत्रिक अडचणी येत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार वातानुकूलित दुमजली बस सुरु करण्यात येत असलेल्या तांत्रिक अडचणी दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाद्‌वारे वातानुकूलित दुमजली (डबल डेकर) बसेस चालविण्यासंदर्भात मुंबई-पुणे या मार्गाची तपासणी करण्यात आली. परंतू उपलब्ध मार्गावर दुमजली (डबल डेकर) बस चालविण्यासंदर्भात तांत्रिक व चालनिय अडचणी असल्याने सद्य:स्थितीत वातानुकूलित डबलडेकर बससेवा मुंबई-पुणे मार्गावर चालविणे राज्य परिवहन महामंडळाच्या व प्रवाशांच्या दृष्टाने हितावह नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्यातील बायपास रस्त्याची झालेली दुरवस्था

**(६२) * २९०४८ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्यातील बायपास रस्त्यावर खड्डे पडले असून रस्त्याच्या दुरवस्थेमुळे बायपास रस्त्यावरील वाहतुक शहरातून होत असून वाहतुकी कोंडी होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अर्धापूर तालुक्यातील बायपास रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. अंशत: खरे आहे.

(२) अर्धापूर शहर बाह्य वळण रस्त्याच्या लांबीत काही भागामध्ये रस्ता क्षतिग्रस्त झाला होता. तथापि, रस्त्याची दुरुस्ती सबंधित कंत्राटदारांच्या दोष दायित्व निवारण कालावधीत कंत्राटदाराच्या खर्चाने करण्यात आलेली आहे.

सद्य:स्थितीत रस्ता सुस्थितीत आहे. रस्त्यावरुन वाहतुक सुरळीत चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग, रोहा, उरण, पेण, पनवेल व मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील पोलीस वसाहतीतील इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत

**(६३) * २८१०८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग, रोहा, उरण, पेण, पनवेल, मुरूड (जि.रायगड) तालुक्यातील पोलीस वसाहतीच्या इमारती या ३० ते ४० वर्षापूर्वीच्या असून अशा जीर्ण व धोकादायक वसाहतीतील पोलीस कर्मचाऱ्यांची कुटुंबे सदर इमारतीत वास्तव्य करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सेदर पोलीस वसाहतीच्या इमारतीची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अलिबाग, रोहा, पेण, पनवेल, मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील पोलीस वसाहती या सर्वसाधारणपणे ३० ते ४० वर्षापूर्वीच्या असून त्यातील काही वसाहती या १०० वर्षापूर्वीच्या आहेत. सा.बां.विभागाकडे देखभाल व दुरुस्तीसाठी असलेल्या वसाहतीमधील सुस्थितीत असलेल्या पोलीस निवासस्थानांमध्ये कर्मचारी वास्तव्यास असून जीर्ण व धोकादायक इमारतींमध्ये पोलीस कर्मचारी वास्तव्यास नाहीत. उरण येथील पोलीस वसाहतींची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडे आहे.
(२) वास्तव्यास असलेल्या पोलीस निवासस्थानांची आवश्यकतेनुसार दुरुस्तीची कामे टप्प्याटप्प्याने मंजूर करुन निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्याने हाती घेण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गिरणा (ता.मालेगांव, जि.नाशिक) नदीपात्रातील अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत**

**(६४) * २७७६५ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गिरणा (ता.मालेगांव, जि.नाशिक) नदीपात्रातुन अनधिकृतरित्या, बेकायदा, अमर्याद वाळूचा उपसा होत असून १५ ते २० फुटाचे खड्डे खोदून वाळू उपसली जात असल्यामुळे नदीपात्राच्या खोलीत वाढ होवून पाण्याचा अंदाज न आल्यामुळे अनेक तरूणांचा बुडून मृत्यू झाल्याचे दिनांक २५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गिरणा नदीपात्रात तरुणांचे बुडून मृत्यू होऊनही वाळू चोरांविरुध्द महसूल व पोलीस विभागाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याने वाळू माफियांचे वर्चस्व वाढले असून संबंधित अधिकारी व वाळुमाफिया यांच्या संगनमताने रस्त्यावर वाळूची सर्रास विक्री होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळु माफियां व संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) दिनांक २५ डिसेंबर २०१६ रोजी गिरणा नदीवरील रोकडोबा बंधारा येथे साठलेल्या पाण्यात पोहत असताना पाण्याचा अंदाज न आल्याने ३ तरूणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.
(२) असे निदर्शनास आले नाही.
(३) मालेगाव तालुक्यात गौणखनिजाचे अवैध उत्खनन/वाहतूकीस प्रतिबंध घालण्यासाठी मंडळ निहाय १० भरारी पथकांची नेमणूक करण्यात आलेली असून, तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी, तलाठी व कोतवाल यांना यासंदर्भात निर्देश देण्यात आले आहेत. सदर पथकांनी माहे एप्रिल, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत केलेल्या तपासणीत वाळूच्या अनधिकृत वाहतुकीच्या ५६ वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन, रुपये २०.५५ लाख एवढी रक्कम वसूल करुन, शासनजमा करण्यात आलेली आहे. तसेच वाळू चोरीबाबत ७ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई जवळील अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्याबाबत

**(६५) * २७३०४ अॅड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, अॅड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.नारायण राणे, श्री.हेमंत टकले, श्री.संजय दत्त, श्री.सुनिल तटकरे, श्री.रामराव वडकुते, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई जवळील अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक शासनामार्फत उभारण्यात येणार असून या स्मारकासह विविध प्रकल्पांसाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे रूपये ४००० कोटींची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या स्मारकाचा जलपूजन व भूमिपूजन सोहळा दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी मा.पंतप्रधान महोदयांचे शुभहस्ते संपन्न झाला असून या सोहळा कार्यक्रमासाठी शासनाकडे निधी नसल्यामुळे रुपये २४ कोटी इतकी रक्कम आकस्मिकता निधीतून काढण्यात आल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुपये २४ कोटी निधी आकस्मिकता निधीतून काढण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, मुंबईमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्यासाठी किती कालावधी निश्चित करण्यात आला आहे, यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली व किती निधी खर्च करण्यात आला आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मुंबई जवळील अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक शासनामार्फत उभारण्यात येणार असून त्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी रू.१०० कोटी तरतूद करण्यात आली आहे. सा.बां. विभागाकडून केंद्र शासनाकडे मागणी करण्यात आलेली नाही.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

मा.पंतप्रधान महोदयांचे हस्ते दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी झालेल्या कार्यक्रमाच्या शुभारंभा संदर्भातील जाहिरात व प्रसिद्धीसाठी रूपये ८ कोटी इतका आकस्मिकता निधी अग्रिम महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई यांना उपलब्ध करून दिलेला आहे. जलपूजन व भूमीपूजन कार्यक्रम एम.एम.आर.डी.ए., रेल्वे विभाग व सा.बां. विभागातर्फे कार्यान्वित करण्यात आला.
(४) मुंबईमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक पूर्ण करण्याकरीता कार्यारंभ आदेशाच्या दिनांकापासून ३६ महिने इतका कालावधी निश्चित करण्यात आला आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी रुपये १०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकल्पाच्या अनुषंगाने सर्वेक्षणे, अहवाल तयार करणे, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची फी इत्यादीसाठी आजपर्यंत रुपये १२७३ लक्ष निधी खर्च करण्यात आला आहे.

-----------------

**चाळीसगांव (ता.सोयगाव, जि.औरंगाबाद) येथील नागरीकांची बसस्थानका अभावी गैरसोय होत असल्याबाबत**

**(६६) * २९०६१ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव (ता.सोयगाव, जि.औरंगाबाद) रस्त्यालगत असलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या जागेत बसस्थानक उभारण्याबाबतची मागणी नागरीकांनी केलेली असतांना शासनाच्या दूर्लक्षामुळे बसस्थानकाचे काम प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बसस्थानका अभावी प्रवाशांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी चाळीसगाव (ता.सोयगाव, जि.औरंगाबाद) येथे बसस्थानक उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) बसस्थानक उभारण्याची मागणी नागरिकांनी केलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील माळ मठाचे या पर्यटन तिर्थक्षेत्राच्या कामाच्या निधीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६७) * २८१५७ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील माळ मठाचे या पर्यटन तिर्थक्षेत्राच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने रुपये ५२ लाखांचा निधी मंजूर केला असता संबंधित ठेकेदाराने रस्ता तयार न करताच रुपये ११ लाखांचा निधी खर्च केल्याचे दाखविण्यात येऊन गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निधीमधून वाहन तळ तयार करणे, शौचालय बांधणे, संरक्षण भिंत बांधणे इ. कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गैरव्यवहार करणाऱ्या ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस मधून होणारी प्रवाशांची घट रोखण्याबाबत

**(६८) * २७१९१ श्री.शरद रणपिसे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्रीमती स्मिता वाघ, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या राज्यातील बस स्थानकावरील गैरसोयी, अस्वच्छता, अपुऱ्या सुविधा, कर्मचाऱ्यांकडून प्रवाश्यांशी होणारी गैरवर्तणूक इत्यादीबाबत सन २०१४-१५ मध्ये १ हजार २७ व सन २०१५-१६ मध्ये १ हजार १२ तक्रारी एस.टी. महामंडळाकडे करण्यात आलेल्या असून महामंडळाच्या बसेस मधून होणाऱ्या प्रवासी संख्येत लाखांनी सतत घट होऊन एस.टी. महामंडळाला कोटयवधींचा तोटा होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एस.टी. महामंडळाला मागील दोन वर्षात किती तोटा झालेला आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रवाश्यांबरोबर गैरवर्तन करणाऱ्या एस.टी. कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच, एस.टी. बसेस मधून होणारी प्रवासी घट रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या राज्यातील बसस्थानकावरील गैरसोयी, अस्वच्छता, अपुऱ्या सुविधा, कर्मचाऱ्यांकडून प्रवाश्यांशी होणारी गैरवर्तणूक इत्यादीबाबत सन २०१४-१५ मध्ये ३५२० व सन २०१५-१६ मध्ये ३३९१ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व बसस्थानकांवर प्रवाशांकरीता आवश्यक त्या मुलभूत सुविधा उपलब्ध करुन, बसस्थानकांची व वाहनतळांची दैनंदिन स्वच्छता करण्यात येत आहे. तसेच, प्रवाशांबरोबर होणाऱ्या गैरवर्तणूकीबाबत राज्य परिवहन महामंडळाच्या प्रचलित शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात येते व प्रवाशांशी सौजन्यपूर्वक वागणेबाबत सर्व कर्मचाऱ्यांना वेळोवेळी सूचना दिल्या जातात.

राज्य परिवहन महामंडळास मार्च-२०१६ अखेर रु.१९२७.७७ कोटी संचित तोटा झाला आहे.

प्रवासी संख्येत वाढ करण्याच्या उद्देशाने विविध उपाययोजना राबविण्यात येत असून वेळोवेळी प्रवासी वाढवा विशेष अभियान राबविण्यात येते. राज्य परिवहन महामंडळाने सन २०१४-१५ मध्ये २४५.५७ कोटी प्रवाशांची वाहतूक केलेली आहे, तर सन २०१५-१६ मध्ये २४५.६१ कोटी प्रवाशांची म्हणजेच गतवर्षीच्या तुलनेत प्रवासी संख्येत वाढ झालेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्हयातील कोयना प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणेबाबत

**(६९) * २७५७१ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक १५७७२ ला दिनांक १४ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील कोयना प्रकल्पग्रस्तांचे पाच जिल्हयांमध्ये पुनर्वसन झाले असून त्यांचे संकलन करीत असताना काही प्रकल्पग्रस्तांची दोन ठिकाणी नावे आली असल्याने एकाच प्रकल्पग्रस्ताला दोन्ही ठिकाणचा लाभ मिळाला असून अनेक प्रकल्पग्रस्त अजुनही लाभापासून वंचित असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोयना प्रकल्पग्रस्तांच्या सुविधेसाठी शासनाकडे पाच कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रकल्पग्रस्तांच्या लाभापासून वंचित राहिलेल्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे. कोयना प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तास दुबार जमीन वाटप झाल्याची तीन प्रकरणे निदर्शनास आली आहेत. त्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच काही पात्र प्रकल्पग्रस्तांना अद्याप पर्यायी जमीन वाटप करणे बाकी आहे.

(२) हे खरे नाही. तथापि, सन २०१६-१७ मध्ये कोयना प्रकल्पातील पुनर्वसित गावांना नागरी सुविधा कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी प्राप्त प्रस्तावांपैकी सुमारे रुपये ३.२४ कोटी व ३.४७ कोटीच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच रुपये १५.६५ कोटींच्या प्रस्तावावर कार्यवाही प्रगतीपथावर आहे. याशिवाय शासनाकडे निधी मागणीसाठी प्राप्त सुमारे रुपये १.७६ कोटीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. रुपये ४.९२ कोटींचा निधी मागणी प्रस्तावावर विभागीय आयुक्त, पुणे यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) सुमारे ८२०३ पात्र कोयना प्रकल्पग्रस्तांपैकी ६८७३ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आले असून, वाटपासाठीचे शिल्लक क्षेत्र व अद्याप पर्यायी जमीन न मिळालेले पात्र खातेदार यांचा ताळमेळ घेऊन पर्यायी जमीन वाटपासाठीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंधुदूर्ग जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(७०) * २६७५३ श्री.नारायण राणे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जुलै ते ऑक्टोबर, २०१६ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पुर परिस्थितीमुळे सिंधुदूर्ग जिल्ह्यातील १६० गावांतील शेती, फळपीक व शेत जमीन असे मिळून २६३ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून सुमारे २००० शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी बाधित क्षेत्राचा अहवाल जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांनी शासनास दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांना कोणत्या स्वरुपाची आर्थिक वा अन्य स्वरुपाची मदत करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडून सविस्तर प्रस्ताव मागविण्यात आला असून नैसर्गिक आपत्तीच्या निकषांनूसार मदत देण्याबाबतची कार्यवाही विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रंगदोष वा रातआंधळेपणा कारणास्तव सेवामुक्त करण्यात आलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या चालकांना पर्यायी नोकरीत सामावून घेणेबाबत**

**(७१) * २८२९२ श्री.हरिसिंग राठोड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील ठाणे, रत्नागिरी, सातारा, अकोला या विभागातील १९८ बस वाहन चालकांची सुमारे १५-२० वर्षे इतकी सेवा झालेली असतांना त्यांना माहे मार्च, २०१५ मध्ये नेत्र तपासणी दाखल्यातील रंगदोष वा रातआंधळेपणा कारणास्तव सेवामुक्त करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाच्या (एस.टी) अकोला विभागातील २६ चालकांना रंग अंधत्वाची बनावट प्रमाणपत्रे दिल्या प्रकरणी जिल्हा शल्यचिकित्सक व चार डॉक्टरांना निलंबित करण्यात येऊन तद्‌नंतर त्यांचे निलंबन रद्द करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संचालक मंडळाच्या ठरावानुसार तसेच कामगार कराराच्या तरतुदीनुसार अपात्र ठरविण्यात आलेल्या राज्य परिवहन ठाणे आगारातील सर्वश्री सुखदेव सोनकर (चालक क्र.४१११), संताजी पानस्कर (चालक क्र.१९१९७) यांचेसह १९६ वाहन चालकांना सुरक्षा रक्षक पदी पर्यायी नोकरीत सामावून घेण्यात यावे, अशा आशयाचे निवेदन एस.टी. कामगार सेना संघटनेने मा.परिवहन मंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, रा.प.महामंडळ, मुंबई यांना दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ रोजी व माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ज्या बस चालकांची १५ ते २० वर्षे सेवा झालेली आहे अशा चालकांना सुरक्षारक्षक वा अन्य पदावर सामावून घेण्याबाबत तसेच, राज्य परिवहन मंडळाच्या अकोला विभागातील अकोला व वाशिम आगारात कार्यरत २६ चालकांना रंग अंधत्वाची जिल्हा शल्यचिकित्सक व डॉक्टरांनी बनावट प्रमाणपत्रे दिल्या प्रकरणी संबंधित दोषी अधिकारी, कर्मचारी व डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

(२), (३) व (४) सार्वजनिक आरोग्य विभागाने जिल्हा शल्य चिकित्सक आणि निवासी वैद्यकीय अधिकारी, अकोला तसेच अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक वाशिम यांना दिनांक २५/०५/२०१६ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले होते. त्यानंतर जिल्हा शल्य चिकित्सक आणि अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक यांना दिनांक ०७/१२/२०१६ चे आदेशान्वये पुन:स्थापित करण्यात आले आहे.

रंग अंधत्व या कारणास्तव अपात्र झालेल्या चालकांना पर्यायी नोकरी देण्याबाबत राज्य परिवहन महामंडळाच्या दिनांक २९/०७/२०१६ च्या परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. राज्य परिवहन महामंडळाद्वारे अकोला विभागातील तत्कालीन विभाग नियंत्रक व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना आरोपपत्र देण्यात आले आहे व कोल्हापूर विभागाच्या विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी यांच्यावर दोषारोप पत्र बजावून विभागीय चौकशी सुरु आहे. तसेच, सार्वजनिक आरोग्य विभागाद्वारे संबंधित डॉक्टरांची चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मराठवाडयात नविन महसूल आयुक्तालय स्थापन करणेबाबत**

**(७२) * २७८४१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयात नवीन महसूल आयुक्तालय स्थापन करण्याबाबत डॉ.दांगट समितीने आपला अहवाल सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात सादर करण्यात आलेल्या मुद्यांची थोडक्यात माहिती काय आहे,

(३) असल्यास, परभणी जिल्ह्यातील जनतेच्या मागणीप्रमाणे जिल्ह्यास नवीन आयुक्तालय देण्यात येणार आहे काय, तसेच किती मुदतीत नवीन आयुक्तालयाची स्थापना करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नवीन आयुक्तालय स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी फेर अभ्यास करुन सुधारीत अहवाल दिनांक ३१/१२/२०१६ रोजी सादर केला आहे. त्यानुषंगाने उचित निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**जव्हार-मलवाडा-वाडा (जि.पालघर) या रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(७३) * २७०८५ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार-मलवाडा-वाडा (जि.पालघर) या रस्त्यांवरील खड्डे भरून, पॅच बांधून रस्त्यावरील केवळ दुरूस्तीचे बांधकाम केलेले असतांना ठेकेदार व संबंधित अधिकारी यांच्या संगनमताने उपरोक्त रस्त्यांचे नवीन बांधकाम केल्याचे दाखवून गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रस्त्यांचे बांधकामासाठी किती रक्कमेची निविदा काढण्यात आली होती व कोणत्या ठेकेदारास बांधकामाचे काम देण्यात आले होते,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकारी व ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) जव्हार-साखरा-मलवाडा-वाडा या रस्त्याचे डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्याच्या कामांच्या भाग दोन निविदा अनुक्रमे

१. जव्हार ते पाली रक्कम रु. १८७९०३६/- मे.सॉलीटियर कन्स्ट्रक्शन जव्हार
२. वाडा-मलवाडा-साखरा भाग रु. ६३२०८६/- मे.विनय भारद्वाज ठाणे यांनी ई-निविदा प्रणाली नुसार विहित कार्यपध्दतीचे पालन करुन देण्यात आल्या होत्या.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागरी सुविधा केंद्र (जि.अमरावती) येथील संचालक**
**नागरिकांकडून जादाचे शुल्क आकारत असल्याबाबत**

**(७४) * २८०६२ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महसूल विभागाने नागरिकांच्या सुविधेसाठी सुरु केलेल्या सेतू नागरी सुविधा केंद्रात प्रॉपर्टी कार्ड, फेरफार व ७/१२ इत्यादी विविध कामांसाठी महसूल विभागाने निश्चित केले शुल्क असतांनाही या केंद्राच्या संचालकांकडून जादाचे शुल्क वसूल करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार उक्त संचालकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशा स्वरुपाची तक्रार अमरावती विभागातील जिल्हाधिकाऱ्यांकडे प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**नागपूर-मुंबई समृध्दी महामार्ग प्रकल्पाकरीता शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध**

**(७५) * २६९९५ श्री.संजय दत्त, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.नारायण राणे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.परिणय फुके, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.तानाजी सावंत, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २३७२८ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**
सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-मुंबई अशा शासनातर्फे उभारण्यात येणाऱ्या समृध्दी महामार्गाकरीता २७ गावांतील हजारो हेक्टर जमीन लॅण्ड पुलिंग अंतर्गत संपादित केल्या असल्याने समृध्दी महामार्गाला शहापूर, भिवंडी आणि कल्याण तालुक्यातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विरोधात स्थापन झालेल्या संघर्ष समिती व मा.मुख्यमंत्री यांच्यासोबत झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन या महामार्गाची निर्मिती करण्यात येणार असल्याने त्याबाबत रस्ते विकास महामंडळाला सूचना केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकल्पात शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी संपादित केल्या जात असून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना त्याची नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) होय.

(३) महामार्गाच्या आखणीमध्ये प्रामुख्याने वरकस जमिनी असून, काही प्रमाणात सुपीक जमिनी आहेत.

महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) अधिनियम, २०१६ मधील जमीन एकत्रिकरण योजनेच्या तरतुदीनुसार या महामार्गासाठी जमिनी प्राप्त करण्यात येत आहेत. शासन निर्णय दिनांक ५ जुलै, २०१६ व दिनांक ४ जानेवारी, २०१७ प्रमाणे संबंधित भूधारकांना लाभ देय आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई-अहमदाबाद शहरांना जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील वर्सोवा पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(७६) * २८४४८ ॲड.अनिल परब, श्रीमती विद्या चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २३४७१ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद शहरांना जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील वर्सोवा पुलाचे चार महिन्यांपासून काम प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मुंबई-अहमदाबाद शहरांना जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील वर्सोवा पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हा महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारीत असून जुना वर्सोवा पुलाच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले असून सुमारे ५ महिन्यात काम पूर्ण करणेचे नियोजन असल्याचे व्यवस्थापक (तांत्रिक), भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सुरत यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय (मेयो) नागपूर येथील काम पूर्ण करण्याबाबत

**(७७) * २७०३७ प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय (मेयो) नागपूर येथील चार माळ्याचे नविन रूग्णालयाचे बांधकाम सुरू असून त्यांची मुदत माहे नोव्हेंबर, २०१६ पर्यंत पूर्ण करावयाचे असतांना अद्याप सदर रूग्णालयाचे काम बांधकाम विभागाकडून पूर्ण झाले नसल्याचे दिनांक १ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर रूग्णालयाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

इमारतीचे बांधकाम माहे डिसेंबर, २०१६ मध्ये अंतिम टप्प्यात प्रगतीत होते.

(२) सदर इमारतीचे बांधकाम सर्वतोपरी पूर्ण करण्यात येऊन उपभोक्ता विभागास दिनांक ५/१/२०१७ रोजी हस्तांतरीत करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महमदाबाद (शे) (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील माण नदीतून अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याबाबत

**(७८) * २८६२४ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महमदाबाद (शे) (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील माण नदीतून अधिकारी व वाळु माफिया यांच्या संगनमताने लाखो रुपयांची वाळू चोरी होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वाळू चोरीचा पंचनामा करुन वाळू माफिया व संबंधित अधिकारी यांच्यावर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) महमदाबाद (शे) (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील माण नदीतून अधिकाऱ्यांच्या संगनमताने वाळूची चोरी होत असल्याचे निदर्शनास आले नाही.

तथापि, मंगळवेढा तालुक्यात वाळूच्या अवैध वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. मंगळवेढा तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी तपासणी पथके गठीत करण्यात आली असून, सदर पथकांनी एप्रिल, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत केलेल्या तपासणीत वाळूच्या अवैध वाहतुकीची १४ वाहने जप्त करून, रुपये २०,१७,६५४/- एवढा दंड आकारण्यात आला आहे. तसेच ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंतरवाडी-कात्रज बाह्य वळण (जि.पुणे) मार्गाची दुरूस्ती व रूंदीकरण करण्याबाबत

**(७९) * २६९३० श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंतरवाडी-कात्रज बाह्य वळण (जि.पुणे) मार्गाची दुरवस्था झाल्यामुळे सदर मार्गावरील ऊंड्री येथील कानडे नगर येथे एका दुचाकीस्वाराचा खराब रस्त्यांमुळे अपघात होऊन मृत्यू झाल्याचे दिनांक २४ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंतरवाडी-कात्रज बाह्य वळण मार्गाची दुरूस्ती व रूंदीकरणासाठी नागरीकांनी शासनाकडे मागणी केलेली असता सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर रस्त्याची दुरूस्ती व रूंदीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, अशंत: खरे आहे.

दुचाकीस्वराचा मृत्यू हा ट्रकच्या धडकेमुळे झाल्याचे पोलीस पंचनाम्यात नमूद केले आहे. पंचनामाची प्रत उपलब्ध आहे. कात्रज कोंढवा मंतरवाडी हा रस्ता राज्यमार्ग ११६ दर्जाचा आहे. खडीमशीन चौक ते मंतरवाडी चौक एकूण लांबी ८.४०० कि.मी. (७१/०० ते ७९/०० कि.मी.) असून, देखभाल व दुरुस्ती अंतर्गत कामे पूर्ण करुन वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

मंतरवाडी-कात्रज बाह्यवळण रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असून, अवजड वाहतूकीची कोंडी होऊन रस्त्याची दुरवस्था झालेली आहे. सदर रस्त्यावर मागील व चालू आर्थिक वर्षात अर्थसंकल्पात कॉन्क्रीटीकरणाची २ कामे मंजूर आहे. मंजूर कामापैकी १ काम ८० टक्के पूर्ण झाले आहे व उर्वरीत काम २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात समाविष्ठ करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी रेडीरेकनर दर अंतिम करण्याबाबत**

**(८०) * २६९९६ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी रेडीरेकनर दर अंतिम करण्याकरीता माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतलेल्या बैठकीत रेडीरेकनरच्या दर वाढीबाबत कोणत्या सूचना देण्यात आल्या तसेच दरवाढीबाबत काय निर्णय घेण्यात आला,

(२) असल्यास, रेडीरेकनर दरामध्ये १० ते १५% वाढ केल्यास शासनाच्या धोरणानुसार सर्वांना परवडणारी घरे बांधणे शक्य होणार आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सन २०१७ या वर्षाकरीता रेडीरेकनरचे दर जाहिर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे वास्तव बाजारमूल्य निश्चित करणे) नियम १९९५ मधील तरतूदीनुसार नोंदणी महानिरीक्षक तथा मुख्य नियंत्रक महसूली प्राधिकारी, महाराष्ट्र राज्य हे दरवर्षी वार्षिक मूल्य दर तक्ते प्रसिद्ध करतात. यासाठीच्या प्रक्रियेमध्ये लोकसहभाग असण्यासाठी संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नोंदणी व मुद्रांक विभागाच्या अधिकाऱ्यांसह लोकप्रतिनिधींची बैठक आयोजित केली जाते. त्यामध्ये पुराव्यानिशी प्राप्त सूचना, मागील वर्षात नोंदविलेल्या व्यवहाराचा सरासरी दर, मिळकतींचे गुण-दोषानुसार विभागणी, वास्तुप्रदर्शनातील दर, स्थानिक चौकशीतील दर, वेबसाईट वरील दर इ. घटकांचा विचार करून वार्षिक मूल्य दर तक्ते निश्चितीबाबत निर्णय घेतला जातो.

त्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०९/०१/२०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीतील चर्चेत वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दर चटई क्षेत्राप्रमाणे असावेत, ते वाढवू नयेत, जेथे दर जास्त असतील तेथे कमी करावेत, मुद्रांक शुल्क कमी करून बाजारभावाप्रमाणे वार्षिक मूल्य दर तक्ते तयार करावेत, मालमत्ता करासाठी वार्षिक मूल्य दर तक्ते वापरण्यात येऊ नयेत इ. सह अन्य सर्वसाधारण सूचना लोकप्रतिनिधींकडून करण्यात आल्या.

उक्त सर्व सूचनांचा सर्वकष विचार करून तसेच मागील वर्षामध्ये घरांच्या तसेच इतर मिळकतींच्या झालेल्या व्यवहारांच्या नोंदींचा उचित परामर्श घेऊन नियमानुसार नोंदणी महानिरीक्षक तथा मुख्य नियंत्रक महसूली प्राधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून वार्षिक मूल्य दर तक्ते दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजी प्रसिद्ध करण्याचे संकल्पित आहे.

घरांच्या किंमती या बाजारातील अनेक घटकांवर अवलंबून असल्याने केवळ वार्षिक मूल्य दर तक्त्यांतील दरांच्या आधारे सर्वांना परवडणारी घरे बांधणे शक्य होईल किंवा कसे याबाबत भाष्य करणे संयुक्तिक होणार नाही.
(४) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पहेला ते गोलेवाडी (ता.जि.भंडारा) रस्त्याची व पुलाची झालेली दुरवस्था**

**(८१) * २९१०५ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पहेला ते गोलेवाडी (ता.जि.भंडारा) रस्त्यावरील दुरवस्थेत असलेल्या पुलाचे बांधकाम आणि रस्ता दुरुस्ती करण्याबाबतची मागणी स्थानिक नागरिकांनी शासनाकडे निवेदनाद्वारे केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार रस्त्यावरील अपघात रोखण्याकरीता सदर रस्त्याच्या व पुलाची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अल्पभूधारक शेतकरी वर्गासाठी अपघात विमा (आम आदमी विमा) योजनेची माहिती शेतकऱ्यांना देण्याबाबत**

**(८२) * २६७८० श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने ग्रामीण भागातील पाच एकर आतील अल्पभूधारक शेतकरी वर्गासाठी अपघात विमा (आम आदमी विमा) योजना सन २००७ पासून सुरु केली असून या आम आदमी विमा योजनेची माहिती सर्वच अल्पभूधारक शेतकऱ्यांना व्हावी यासाठी कृषी सहाय्यक, तलाठी, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका यांच्याकडे जबाबदारी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेची माहिती उपरोक्त कर्मचाऱ्यांमार्फत शेतकऱ्यांना दिली नसल्यामुळे या योजनेचा फायदा शेतकऱ्यांना होत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अल्पभूधारक शेतकरी वर्गासाठी अपघात विमा (आम आदमी विमा) योजनेचा फायदा शेतकऱ्यांना होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही. आम आदमी विमा योजना सन २००७ पासून राबविण्यात येत असून या योजनेंतर्गत लाभार्थ्याचा शोध संबंधित तलाठी यांनी घ्यावयाचा आहे.
(२) नाही.
(३) सदर योजनेच्या माहिती / प्रसार प्रसिध्दीकरिता फलक लावणे, दवंडी देणे, प्रसिध्दी देणे या माध्यमाचा वापर करण्यात येतो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील खारेपाटातील शेतीला समुद्रातील उधाणाच्या पाण्यामुळे धोका निर्माण होत असल्याबाबत**

**(८३) * २८१०९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खारेपाटातील माणकुळे, बहिरीचापाडा, धेरंड, शहापूर (ता.अलिबाग, जि.रायगड) गावांना व भातशेतीला समुद्रातील भरतीच्या पाण्याचा धोका असून या भागातील अस्तित्वात असलेले बांधबंदिस्त बंधारे फुटून गेलेली असून अनेक वर्षापासून त्याची दुरूस्ती अथवा बांधबंदिस्त बंधारे बांधण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समुद्राच्या भरतीचे पाणी अनेक वेळा खारेपाटातील गावांमध्ये व भातशेतीमध्ये शिरल्याने गावांचे व भातशेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील क्षेत्र ३ हजार १६ हेक्टर शेत जमीन समुद्राच्या भरतीच्या पाण्यामुळे कायमचीच नापीक झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील खारेपाट विभागातील गावांचे व भातशेतीचे समुद्राच्या भरतीमुळे नुकसान होवू नये म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अलिबाग तालुक्यातील एकूण पाच शासकीय योजनांच्या ११८२ हेक्टर क्षेत्रापैकी १०५० हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे.
(३) मानकुले व बहिरीचापाडा ही गावे मानकुले या शासकीय खारभूमी योजनेमध्ये समाविष्ट आहेत. मानकुले ही योजना मोठया प्रमाणावर कमकुवत झाली असून, मानकुले व सोनकोठा हाशिवरे या दोन योजनांचे एकत्रित नुतनीकरणाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीपथावर आहे. तसेच धेरंड व धाकटापाडा शहापूर या शासकीय खारभूमी योजनांच्या बांधाची सन २०१६ मधील उधाणांमुळे व पुरांमुळे झालेल्या नुकसानीची दुरूस्तीची कामे पूर्ण करण्यात आली असून, पुन:प्रापित क्षेत्र बाधित होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे.

मोठापाडा शहापूर ही खाजगी योजना असल्यामुळे, सदर योजनांचे काम शासनामार्फत केली जात नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.